पुणे.
जीवन शिक्षण
वर्ष : ६८, अंक : ७
ऑक्टोबर, २०२३ (मासिक)
किंमत : रु. ३०/–
पृष्ठे : ४४


# जीवन शिक्षण


ISSN (Print) : Applied...
Pune
**Jeevan Shikshan**
Vol. : 68, Issue : 7
October, 2023 (Monthly)
Price - ₹ 30/-
Pages 44





ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक मा. अमोल येडगे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते शिक्षक दिनाचे औचित्य साधून शालेय शिक्षण विभागाचे मुखपत्र असलेल्या जीवन शिक्षण मासिकाचा 'माझ्या आठवणीतील गुरू' हा विशेषांक प्रकाशित केला. यावेळी परिषदेतील अन्य अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.





एनएसईआरटी, नवी दिल्ली व एससीईआरटी, महाराष्ट्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने
दि. ५ सप्टेंबर, ते दि. ८ सप्टेंबर, २०२३ या कालावधीमध्ये Capacity Building of Teachers and Teacher Educators regarding FLN at Foundational and Preparatory stage
या कार्यशाळेचे आयोजन पुणे येथे करण्यात आले होते.
याप्रसंगी राज्यभरातून अधिकारी, शिक्षक इ. उपस्थित होते.





राज्य साक्षरता केंद्र, एससीईआरटी, महाराष्ट्र, पुणे येथे शिक्षक दिनाच्या दिवशी
मा. उषा शर्मा, राष्ट्रीय साक्षरता केंद्रप्रमुख, एनएसईआरटी, नवी दिल्ली यांनी
भेट देऊन नवभारत साक्षरता कार्यक्रमासाठी विकसित केलेल्या
अध्ययन-अध्यापन साहित्याबाबत समाधान व्यक्त केले.

# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

- मूल्य : रु. ३०/-
- वार्षिक वर्गणी रु. ३००/-
- प्रती : ५७,०००

वर्ष ६८ ऑक्टोबर, २०२३ अंक ७ वा



- प्रवर्तक : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- प्रकाशन सल्लागार समिती :

**अमोल येडगे** (भा.प्र.से.), संचालक **अध्यक्ष**

**रमाकांत काठमोरे**, सहसंचालक **कार्यकारी संपादक**

**डॉ. दिपक माळी**, प्रशासनाधिकारी तथा प्राचार्य, आय.टी. व प्रसारमाध्यम **सहसंपादक**

**डॉ. कमलादेवी आवटे**, प्राचार्य, भाषा आणि समन्वय **सदस्य**

**डॉ. शोभा खंदारे**, प्राचार्य, जि. शि. व प्र. सं., पुणे. **सदस्य**

**ज्योती उपाशी**, सहा. संचालक, लेखा **सदस्य**

**रत्नप्रभा भालेराव**, वरिष्ठ अधिव्याख्याता **सदस्य**

**सचिन चव्हाण**, वरिष्ठ अधिव्याख्याता **सदस्य**

- **निर्मिती सहायक :**

**अपर्णा शेंडकर**,
अधीक्षक (वर्ग-२) प्रसारमाध्यम

- **संपादन मंडळ :**

माधव राजगुरू, नंदा कुलकर्णी,
श्रीकांत चौगुले, सलिल वाघमारे.

- **संपादक :**

**अरुण सांगोलकर**, वरिष्ठ अधिव्याख्याता तथा विभाग प्रमुख (प्रसारमाध्यम, इंग्रजी आणि उर्दू) **सदस्य सचिव**


## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | - | ४ |
| गुरुजींच्या खुर्चीची किमया | युवराज माने | ५ |
| फटाक्यांची रोषणाई क्षणभर, ज्ञानाची रोषणाई आयुष्यभर! | रवींद्र केदार | ७ |
| 'इंटरनेट' काळाची गरज | मंजूषा स्वामी | ९ |
| वृत्तपत्र वाचूया, संस्कारधन वेचूया! | अंजली गोडसे | १५ |
| कल्पक श्रावण | शिल्पा वनमाळी | १८ |
| शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा व कलेचे महत्त्व | मनोहर बाविस्कर | २० |
| बलशाली राष्ट्रनिर्मितीसाठी म. गांधीजींचे शिक्षणविषयक विचार | वृषाली कडलग | २५ |
| चित्रकार्ड व शब्दांचे झाड मुलांच्या वाचनासाठी उपयुक्त ठरले... | विनोद राठोड | २८ |
| माझी उपक्रमशील शाळा | पूनम खोराटे | ३० |
| Student Self-evaluation | Dr. Swati Khaire | ३२ |
| वाचन : एक अमृतानुभव! | पी. एम. काळे | ३४ |
| परसबागेचे महत्त्व व शैक्षणिक उपयोजन | प्रा. विजयकुमार पाईकराव | ३६ |
| प्रिय संपादक | - | ४१ |
| इतिहासाच्या पानांवरून | श्रीकांत चौगुले | ४२ |



'जीवन शिक्षण' हे मासिक मालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक अरुण सांगोलकर यांनी रुना ग्राफिक्स, स. नं. ६४, त्रिमुर्ती हॉस्पिटलमागे, वडगांव (बु.), सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१ येथे छापून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : अरुण सांगोलकर.

'Jeevan Shikshan' monthly publication is owned by Rajya Shaikshanik Sanshodhan Va Prashikshan Parishad, Maharashtra, Printed and Published by Arun Sangolkar, Printed at Runa Graphics, S. No. 64, Behind Trimurti Hospital, Vadgaon (Bk.), Sinhagad Road, Pune - 411 041 and Published at Rajya Shaikshanik Sanshodhan Va Prashikshan Parishad, Maharashtra, 708, Sadashiv Peth, Pune 411 030. Editor : Arun Sangolkar.

**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in **वेब लिंक :** https://scertmaha.ac.in/jeevanshikshan/



*या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय ....

मित्रहो,

आदर्श शिक्षणव्यवस्था ही कोणत्याही समाजव्यवस्थेचे, देशाचे बलस्थान असते. शिक्षणव्यवस्थेमध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे शिक्षणातून माणूस घडविण्याच्या दृष्टीने, शिक्षकांनी आपली सर्जनशीलता उपयोगात आणणे आवश्यक आहे. शिक्षकांची भूमिका ही खरे तर माणूस घडवणाऱ्या शिल्पकाराची असते. भारतीय शिक्षकांमध्ये प्रचंड क्षमता व सामर्थ्य आहे. शिक्षकांनी आपल्या या क्षमतांचा व सामर्थ्याचा सर्वार्थाने वापर करायचे ठरवले, तर देशाच्या शिक्षणव्यवस्थेत, पर्यायाने देशाच्या एकूणच जडणघडणीत आमूलाग्र बदल होऊ शकतो. शिक्षकांच्या अभिव्यक्तीचा दर्जा जितका उच्च, तितका त्यांच्या अध्यापनाचा दर्जा उच्च असतो. अध्यापनाच्या माध्यमातून शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व अभिव्यक्त होत असते. आधुनिक जगातील बदलते संदर्भ लक्षात घेऊन, शिक्षकांनी स्वतःला अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. राज्यातील अनेक शिक्षक त्यादृष्टीने प्रयत्नशील असल्याची उदाहरणे आहेत. अनेक शिक्षक वैयक्तिक पातळीवर अभिनव उपक्रम राबवून शिक्षण अधिक मनोरंजक व आधुनिक करण्याचा प्रयत्न करत आहेत, ही अत्यंत दिलासादायक बाब आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात शालेय शिक्षणात प्रचंड प्रमाणात प्रगती झाली आहे, ही बाब निश्चित आहे; तरीही ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाकडे, विशेषतः मुलींच्या शिक्षणाकडे आणखी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. एकही मूल शालाबाह्य राहणार नाही, मुलांची गळती होणार नाही याची काळजी घेणे आपणा सर्वांची जबाबदारी व कर्तव्य आहे. यासाठी आपण सर्व जण सतत जागृत व कार्यरत राहूया.

'माझे जीवन हाच माझा संदेश', असे म्हणणाऱ्या महात्मा गांधीजींचा २ ऑक्टोबर हा जन्मदिन. महात्मा गांधीजी यांनी सत्य, अहिंसा, सत्याग्रह या अभिनव संकल्पना प्रथमतः मांडल्या आणि त्यांचा स्वातंत्र्यलढ्यात सुयोग्य असा वापर केला. कोणत्याही बलाढ्य सत्तेला आपण शस्त्रबलाशिवाय नमवू शकतो, हा विश्वास समस्त भारतीयांमध्ये निर्माण केला.

स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचाही २ ऑक्टोबर हा जन्मदिन. पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतरही आपल्या साध्या राहणीमुळे आणि विनम्र व्यक्तिमत्त्वामुळे सर्वांना सुपरिचित असणारे शास्त्रीजी, तेवढेच कर्तव्यनिष्ठ व कणखर होते, हे त्यांनी वेळोवेळी सिद्ध केले आहे.

भारताच्या या दोन्ही महान सुपुत्रांना त्यांच्या जन्मदिनानिमित्त विनम्र अभिवादन.

ऑक्टोबर २०२३ चा 'जीवन शिक्षण' चा अंक विविध विषयांनी समृद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सदर अंक विद्यार्थी, शिक्षक व इतर अभ्यासूंना उपयुक्त ठरेल आणि नेहमीप्रमाणे त्याचे सर्व स्तरांतून स्वागत होईल अशी मला आशा आहे.

**संपादक**
जीवन शिक्षण
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# गुरुजींच्या खुर्चीची किमया !

**युवराज माने**
जि. प. प्राथ. शाळा पारडी,
ता. सेलू, जिल्हा परभणी

*वर्गात काही मुले खोडकर असतात. कधी कधी ती इतरांच्या दप्तरातून वस्तू घेतात. पैसे घेतात. त्याचा शोध घेणे फार अवघड असते. अशा मुलांची चोरी पकडली गेली, तर इतर मुलांच्या नजरेत ती चोर ठरतात. ती वेळीच सुधारली नाही, तर त्यांच्यातील दुर्गुण बळावतो. असे होऊ नये यासाठी शिक्षक प्रयत्न करतात. विविध युक्त्या योजतात. अशीच एक युक्ती एका शिक्षकाने अवलंबली. त्याचा हा कथावजा वृत्तांत, परिणामकारक आहे.*

परिपाठ संपला, तशी लेकरे आपापल्या वर्गात जाऊन बसली. पहिली वीस मिनिटे मौन वाचनाची होती. वर्गात आल्यावर लेकरांचे मन स्थिर व्हावे आणि वर्गातील कृतीत त्यांचे मन एकाग्र व्हावे, यासाठी ही कृती असायची. लेकरांचे वाचन संपले. गुरुजींचा सुसंगत वाक्यांचा परिच्छेद तयार करणे, हा घटक सुरू झाला. गुरुजी व लेकरांची त्यावर चर्चा सुरू होती. सगळी लेकरे उत्साहात चर्चेत सहभागी झाली होती, पण ममता उदास दिसत होती. ती पुन्हापुन्हा आपल्या दप्तरात काहीतरी शोधत होती. तिचा चेहरा रडवेला दिसत होता. गुरुजींनी चर्चा थांबवून ममताला जवळ बोलावून विचारले असता समजले, की तिने वडिलांकडून वही, पेन घेण्यासाठी १०० रुपये आणले होते. ते पैसे ती आता गुरुजींना देणार होती. तांड्यावर न मिळणाऱ्या वस्तू गुरुजी तालुक्याच्या गावावरून मुलांना विकत आणून देत असत. ममतालाही वह्या हव्या होत्या. त्यासाठीच हट्ट करून तिने वडिलांकडून पैसे आणले होते, पण दप्तरात ठेवलेले पैसे आता सापडत नव्हते; म्हणून ती रडू लागली. घडलेला प्रसंग गुरुजींच्या लक्षात आला. पैसे ममताच्या दप्तरातून पडले असावेत किंवा वर्गातील लेकरांपैकीच कोणीतरी घेतले असावेत, असा गुरुजींना संशय आला.

खरे तर दप्तरातून पडलेले पैसे लेकरांनी प्रमाणिकपणे आणून द्यावे ही गुरुजींची अपेक्षा होती; पण शेवटी ती लेकरेच ! आता गुरुजींसमोर प्रश्न होता, की पैसे तर लेकरांकडून काढायचे आहेत, पण कसे काढावे ? लेकरांना त्यांनी आवाहन केले, की 'कोणाला पैसे सापडले असतील, तर आणून द्या; त्याला आपण शाबासकी देऊ.' गुरुजींच्या या आवाहनाचा काही उपयोग झाला नाही. आता दुसरा उपाय होता, की मुलांच्या गणवेशाच्या खिशांची व दप्तराची तपासणी करणे. तशी गुरुजींनी मुलांना सूचना केली, तर लेकरे तयार झाली. तरीही गुरुजींना मात्र त्यांचे मन तसे करण्याची परवानगी देत नव्हते. या तपासणीत एखादे लेकरू सापडले, तर त्या लेकराच्या कपाळावर आयुष्यभर पैसे चोरल्याचा शिक्का बसेल, हा विचार मनात येताच गुरुजींच्या काळजात धस्स झाले. खरे तर बालपणापासून लेकरांच्या कपाळावर नालायक, गाढव, बुद्दू, मंद, याला अक्कलच नाही, याला काही कळतच नाही, असे अनेक शिक्के मारून आपण मोकळे होतो. त्याचे परिणाम त्या लेकराला आयुष्यभर भोगावे लागतात. माझ्या लेकरांच्या नशिबी हे यायला नको, म्हणून गुरुजी सतत काळजी घेत असायचे, लेकरांना जपायचे.

'प्रेम' या एका गोष्टीवर गुरुजींची अपार निष्ठा होती व विश्वासही होता. शिकण्याची खरी सुरुवात प्रेमाची भाषाच असते, हे त्यांनी जाणले होते. ते खुर्चीवरून

उठले आणि लेकरांसोबत खाली बसले. लेकरांना जवळ घेऊन ते बोलू लागले.

मुलांनो, ''ममताच्या वडिलांना १०० रुपये कमावण्यासाठी किती मेहनत करावी लागली असेल. दुसऱ्याच्या शेतात उन्हात राबावे लागले असेल. त्यांनी आठ दिवस कष्ट करून नंतर ममताला हे पैसे दिले होते. तिला ते पैसे खाऊसाठी नाही, तर शिक्षणासाठी दिले होते. त्यांना ममता शिकून मोठी व्हावी असे वाटत होते, म्हणून दिले होते.''

''तुम्हांलाही तुमचे आई–वडील अशीच मदत करतात. तुम्ही शिकून मोठे व्हावे असे त्यांना वाटते. तुमच्याविषयी ते किती छान विचार करतात. त्यांना जर हे कळले, की माझा मुलगा/मुलगी चोरी करते, तर त्यांना किती वाईट वाटेल. बरोबर ना?'' गुरुजी असे सांगत असताना अनेक लेकरांच्या डोळ्यांत त्यांना अश्रू दिसले. ते आणखी पुढे जाऊन सांगू लागले. ''बाळांनो, मी तुमच्यावर खूप प्रेम करतो. मला आज वाईट वाटत आहे, की माझ्या वर्गात चोरी झाली. कोणी तरी चोर म्हणून आज सिद्‌ध होईल. माझा विद्यार्थी चोर म्हणून पुढे आल्यास मला मुळीच आवडणार नाही. गुरुजी म्हणून ही माझी हार असेल. आणखी एक गोष्ट तुम्हांला सांगायची आहे, ऐका, आता मी तुमच्यासोबत खाली बसलो आहे; पण समोर जी खुर्ची आहे ना, ती साधी खुर्ची नाही. मला ही खुर्ची सहज मिळाली नाही. मला त्यासाठी खूप अभ्यास करावा लागला आहे. मी खूप जिद्दीने ती खुर्ची मिळवली आहे. त्या खुर्चीची जादू माहीत आहे का तुम्हांला? गुरुजींच्या या खुर्चीवर जो बसतो, तो आपल्या विद्यार्थ्यांतून राष्ट्रपती, पंतप्रधान, जिल्हाधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर, पोलीस, कलावंत आणि उत्तम नागरिक घडवतो. ही खुर्ची चोर म्हणून कधीच कोणाला घडवत नाही, तो या खुर्चीचा अपमान आहे.''

''बाळांनो, माझी या खुर्चीवर खूप निष्ठा आहे. या खुर्चीवर माझे खूप प्रेम आहे व खूप मोठा विश्वास आहे. मला काय म्हणायचे आहे हे तुम्हांला नक्कीच कळले असेल असे वाटते.'' असे बोलून गुरुजी मुलांच्या डोळ्यांत पाहू लागले, तर सर्व लेकरांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. मुलांची मने गुरुजींनी जिंकली होती. लगेच गुरुजी मुलांना म्हणाले, ''चला एक काम करू. आपण सर्व जण बाहेर जाऊ. वर्गात फक्त ही खुर्ची असेल. बाहेरून प्रत्येकाने आत यायचे या खुर्चीचे दर्शन घ्यायचे आणि ज्याने पैसे घेतले असतील, त्याने तेथे पैसे ठेवून परत यायचे. एका वेळी एकानेच वर्गात जायचे. एखादा मुलगा जरी पैसे ठेवून गेला, तरी कोणी कोणाला काहीही सांगणार नाही, चर्चा करणार नाही.''

कृती सुरू झाली. एक एक लेकरू आत जाऊ लागले आणि खुर्चीचे दर्शन घेऊन बाहेर येऊ लागले. शाळेतील इतरही लेकरे हे सर्व कुतूहलाने पाहत होती. शेवटचे लेकरू होते ममता. गुरुजी ममताला विश्वासाने म्हणाले, ''ममता आत जा आणि त्या खुर्चीवरचे १०० रुपये घेऊन ये. ममता गुरुजींच्या तोंडाकडे पाहू लागली. ममता वर्गाच्या दिशेने जाऊ लागली. गुरुजी निश्चिंत होते; कारण त्यांचा त्यांच्या गुरुजीपणावर, खुर्चीवर अन् लेकरांवर खूप मोठा विश्वास होता.

ममता १०० रुपये घेऊन पळतच बाहेर आली अन् गुरुजींचा जीव भांड्यात पडला. गुरुजींच्या डोळ्यांत आनंदाचे, विजयाचे अश्रू होते. त्यांनी लेकरांना जवळ घेतले. गुरुजींसोबत लेकरेही रडू लागली. गुरुजींच्या मनात आले, आज माझे एक लेकरू चोर होण्यापासून, चोर नावाचा शिक्का लागण्यापासून वाचले. आज माझ्या गुरुजीपदाच्या खुर्चीची किमया माझ्यासह माझ्या लेकरांना समजली.

# फटाक्यांची रोषणाई क्षणभर, ज्ञानाची रोषणाई आयुष्यभर!

**रवींद्र केदार**
'स्मार्ट टू ग्लोबल स्कूल' विद्या मंदिर,
यादववाडी, ता. करवीर जि. कोल्हापूर.
भ्रमणध्वनी : ९४२१३४८६११

*पर्यावरणस्नेही दिवाळी साजरी करून विद्यार्थ्यांनी केला वाचनसंस्कृतीचा परिपोष...!*

पुस्तक वाचनाने मनाचे आरोग्य सुधारते. पुस्तके योग्य मार्ग दाखवणारे गुरू असतात. पुस्तकांशिवाय शाळेची कल्पनाच आपण करू शकत नाही. संपन्न भारताच्या निर्मितीसाठी विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजवली पाहिजे असे मला मनोमन वाटते. लॉकडाऊनच्या काळात मी वर्गात 'स्मार्ट टू ग्लोबल क्लासरूम' हा महत्त्वाकांक्षी व नावीन्यपूर्ण उपक्रम राबवला होता. त्या अंतर्गत काही पूरक उपक्रम राबवले, त्यांतील सर्वांत महत्त्वाचा उपक्रम होता 'वाचू आनंदे.'

या उपक्रमांतर्गत मी वर्गस्तरावर वाचनालय सुरू करायचे ठरवले. दिवाळीच्या सुट्टीच्या अगोदर मी पर्यावरणतज्ज्ञ असलेल्या व सध्या अमेरिकेत स्थायिक असलेल्या डॉ. संगीता तोडमल यांच्याशी मुलांचा आभासी संवाद घडवून आणला. त्यांनी मुलांना दिवाळीत फटाके वाजवल्यावर पर्यावरण व मानवी जीवनावर होणारे दुष्परिणाम समजावून सांगितले. त्यामुळे 'आम्ही अजिबात फटाके वाजवणार नाही,' असे आश्वासन मुलांनी दिले. मग तुम्ही फटाक्यांसाठी मिळालेल्या पैशांचे काय करणार? असा प्रश्न विचारल्यावर जान्हवी नावाच्या माझ्या एका विद्यार्थिनीने, 'आम्ही त्या पैशांतून वर्गातील वाचनालयाला पुस्तके देऊ,' असे उत्तर दिले. सर्व विद्यार्थ्यांनी यासाठी सहमती दर्शवली. घरी गेल्यावर मुलांनी आपला संकल्प आपल्या पालकांना सांगितला. त्यांना आपल्या पाल्यांचे विचार ऐकून अत्यानंद झाला.

सर्वप्रथम मी स्वतः वर्ग वाचनालयाला पाच हजार रुपयांची पुस्तके भेट देऊन सुरुवात केली. वर्गातील ३६ पैकी ३६ मुलांनी दिवाळी सुट्टीनंतरच्या पहिल्या दिवशी तब्बल १२,७३५ रुपयांची पुस्तके वर्गस्तरीय वाचनालयाला भेट दिली. शाळेत वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी लहानग्यांनी केलेली ही क्रांतीच होती. शिवाय प्रदूषण वाढू नये; म्हणून ३६ मुलांच्या मनावर अगदी कोवळ्या वयात, 'फटाके वाजवायचे नाहीत' हा लाखमोलाचा विचार कायमचा कोरला गेला. मुलांनी वाचनालयाला भेट दिलेल्या पुस्तकांची बातमी स्थानिक वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध होताच, गावातील तरुण मंडळे, वाचनप्रेमी यांनी आम्हांला आणखी पुस्तके भेट दिली.

> *'फटाक्यांचा आनंद क्षणभराचा असतो. ज्ञानाचा आनंद कायमस्वरूपी असतो.' हा विचार मुलांच्या मनावर बिंबवल्याने फटाक्यांऐवजी पुस्तकांचा पर्याय मुलांनी निवडला त्यातून वर्गवाचनालय आकाराला आले. त्या वाचनालयाचा लाभ मुलांच्या जडणघडणीसाठी झाला. हा सर्व प्रवास स्वतः शिक्षकाने आपल्या अनुभवसिद्धतेतून मांडला आहे.*



सोशल मीडियावर या उपक्रमाबद्दल मी लिहीत होतो, त्यामुळे राज्यभरातून आमच्या या उपक्रमाची दखल घेऊन पुस्तकप्रेमींनी आम्हांला पुस्तके पाठवली. आता आमच्या वाचनालयात जवळजवळ ५०० पुस्तके जमा झाली होती. पर्यावरण संवर्धनासाठी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करून, त्याच पैशांतून या मुलांनी पुस्तके विकत घेऊन खऱ्या अर्थाने ज्ञानाची दिवाळी साजरी केली होती.

ही पुस्तके प्राप्त झाल्यानंतर, आम्ही पुस्तक वाटपाचे रजिस्टर करून त्याची जबाबदारी जान्हवी नावाच्या विद्यार्थिनीकडे दिली. दर शनिवारी वाचनालयातून नवीन पुस्तके घ्यायची व वाचलेली पुस्तके जमा करायची. सुरुवातीला मुलांना पुस्तक वाचनाची आवड लागावी यासाठी गोष्टींची छोटीछोटी पुस्तके, विज्ञानातील गमतीजमती, त्यानंतर थोर महापुरुषांबद्दल माहिती असणारी छोटीछोटी पुस्तके वाचायला दिली. यामुळे मुलांना पुस्तके वाचायला आवडू लागली. आठवड्यातून किमान एक पुस्तक वाचायचे आणि वर्गात त्या पुस्तकाचा परिचय करून द्यायचा. या उपक्रमात मला या पुस्तकात काय शिकायला मिळाले, मला हे पुस्तक कसे वाटले, याबद्दल मुलांनी पुढे येऊन माहिती सांगायची, असा नित्यक्रम ठरला. आता पुस्तकवाचन मुलांसाठी नित्यक्रमच ठरला होता. विद्यार्थी वाचनालयातून पुस्तके घेऊन वाचनाचा मनमुराद आनंद घेत होते.

मुलांना वाचनाची गोडी लावण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त होता. वाचनाची सवय मुलांना लागली होती, मग मी माझ्या वर्गासाठी वर्तमानपत्र उपलब्ध करून देण्याचे ठरवले. त्यानुसार 'सकाळ' हे वर्तमानपत्र मुलांना वाचण्यासाठी उपलब्ध करून दिले. त्यातील 'बालमित्र' पुरवणी मुले आवडीने वाचत, शिवाय परिपाठामध्ये बातम्या सांगण्यासाठी आवर्जून बातम्या वाचत असत, यामुळे मुलांच्या ज्ञानात आणखी भर पडली. मधल्या सुट्टीत किंवा जेव्हा मोकळा वेळ मिळेल तेव्हा आपोआपच मुलांची पावले वर्तमानपत्र वाचण्यासाठी वळू लागली. मुलांना वाचनाची आवड लागल्यामुळे वाचनसंस्कृतीचा परिपोष होण्यास आणखी मदत झाली.

पुस्तकांच्या वाचनामुळे मुलांच्या ज्ञानाची खोली व विचारांची उंची नक्कीच वाढणार होती. पुस्तक वाचल्यामुळे ज्ञानात भर पडते. जीवन संस्कारित होते. फटाक्यांसाठी मिळालेल्या पैशांतून मुलांनी पुस्तके खरेदी करून वर्गासाठी भेट दिली, असे पहिल्यांदाच घडले असावे. वाचनाचे महत्त्व समजावे म्हणून आपण दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करतो. जर शिक्षकांनी व मुलांनी ठरवले, तर शाळेचा प्रत्येक दिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करता येईल. बालपणापासून पुस्तके वाचल्यामुळे या चिमुकल्यांमधूनच आपल्याला डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, कल्पना चावला, मेरी क्युरी यांसारखे देशाचे आधारस्तंभ घडवता येतील असा विश्वास वाटतो.

### उपक्रमाची यशस्विता :

(१) मुलांना फटाके वाजविण्याचे तोटे समजल्यामुळे पर्यावरण जाणीवजागृती झाली. स्वयंप्रेरणेने मुलांनी त्याच पैशांतून पुस्तके विकत घेतली हा मुलांमध्ये झालेला शाश्वत बदल आहे.

(२) मुलांनी स्वयंप्रेरणेने वाचनालयाला पुस्तके भेट दिली. वर्गातच पुस्तके उपलब्ध झाल्यामुळे पाहिजे तेव्हा पुस्तके उपलब्ध झाली.

(३) भावनिक, बौद्धिक, सामाजिक विकास होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास बहुमोल मदत झाली.

**(पृष्ठ क्र. १४ वर)**

# ‘इंटरनेट’ काळाची गरज

**मंजूषा स्वामी**
जि. प. प्राथ. शाळा किणी,
ता. जि. उस्मानाबाद
भ्रमणध्वनी : ९४२१४४४२९२

*सध्याचे जग हे संगणकाचे, इंटरनेटचे आहे असे मानले जाते. सर्वच क्षेत्रांत इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो आहे. इंटरनेटच्या वापरामुळे अनेक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. आपल्या जीवनात अनेक बदल झाले आहेत. इंटरनेटने व्यापलेली विविध क्षेत्रे व त्याबाबतची माहिती देणारा हा लेख.*

## इंटरनेटचा इतिहास :

आज आपण तंत्रज्ञानाचे जे विकसित रूप पाहात आहोत, त्यासाठी शास्त्रज्ञांना खूप संशोधन करावे लागले आहे. त्यामुळे कोणी एकाने हा शोध लावला असे म्हणता येणार नाही; तरीही बॉब कान आणि विंटन ग्रे सर्फ या दोन अमेरिकन शास्त्रज्ञांनी इंटरनेटचा शोध लावला असे म्हटले जाते. त्यांनी सर्वांत प्रथम TCP/IP विकसित केले, जो प्रोटोकॉलचा एक संच आहे. जो नेटवर्कद्वारे डेटा कसा हलतो हे नियंत्रित करतो. यामुळे ARPANET ला आपण आज वापरत असलेल्या इंटरनेटमध्ये विकसित होण्यास मदत झाली. ‘इंटरनेट’ शब्दाचा पहिला लिखित वापर करण्याचे श्रेय विंटन ग्रे सर्फ यांना दिले जाते. सन १९६९ मध्ये Arpanet नावाचे नेटवर्क सुरू झाले. चार संगणक एकमेकांना जोडून हे नेटवर्क तयार करण्यात आले. हळूहळू संगणकांची संख्या वाढवण्यात आली. यानंतर हे नेटवर्क बंद पडले आणि सन १९०० मध्ये निकोला टेसला यांनी वायरलेस प्रणालीची कल्पना मांडली. अनेक संशोधकांनी यावर काम केले. आपल्या भारत देशात १५ ऑगस्ट, १९९५ रोजी इंटरनेट वापरायला सुरुवात झाली. त्या काळी सुरुवातीला इंटरनेटचा स्पीड हा ८ ते १० kbps होता. इंटरनेटला मराठीमध्ये ‘महाजाल’ किंवा ‘आंतरजाल’ असे म्हणतात. इंटरनेट ही संकल्पना फक्त आणि फक्त तंत्रज्ञानामुळे शक्य झाली. इंटरनेटची संकल्पना जेव्हा रुजली, तेव्हा अनेक शास्त्रज्ञांनी त्यावर काम करायला सुरुवात केली. यासाठी बराच काळ जावा लागला. अनेक शोध लावले गेले. www यालाच ‘वर्ल्ड वाईड वेब’ असेही म्हटले जाते. हे नेटवर्क छोट्या–छोट्या नेटवर्कद्वारे जगभर पसरले आहे.

## इंटरनेटची उद्दिष्टे :

- लोकांना इंटरनेटशी संबंधित जोखमींबद्दल शिक्षित करणे.
- इंटरनेट सुरक्षितपणे वापरण्यासाठी सक्षम करणे.
- जागतिक उपक्रमात सहभागी होऊन व्यक्ती, शाळा आणि व्यवसाय प्रत्येकासाठी एक सुरक्षित ऑनलाईन समुदाय तयार करण्यात मदत करणे.

## इंटरनेटचे फायदे :

**माहितीची देवाणघेवाण करणे :** संदेश पाठवणे, लवकरात लवकर माहिती पोहोचवणे किंवा माहिती मिळवणे यासाठी आज इंटरनेटचा अधिकाधिक वापर केला जातो. इंटरनेटचा वापर करून आज आपण कोणतीही माहिती एका क्लिकवर मिळवू शकतो. कोणत्याही विषयाची माहिती, वेगवेगळी उत्पादने, त्यांचे उपयोग, फायदे–तोटे, औषधे, बस, ट्रेनचे वेळापत्रक या सगळ्यांची माहिती इंटरनेटद्वारे आपल्याला एका क्षणात मिळू शकते.

**वैद्यकीय क्षेत्र :** वैद्यकीय क्षेत्रात इंटरनेटचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. एखाद्या आजारावरील माहिती मिळवण्यासाठी, त्यावरील इतर डॉक्टरांचे रिसर्च पाहण्यासाठी, तसेच रुग्णांची माहिती नोंद करून ठेवण्यासाठी इंटरनेटचा उपयोग होतो. डॉक्टर आपल्या हॉस्पिटलमध्ये बसून परदेशातील तज्ज्ञ डॉक्टरांशी सल्ला–मसलत करू शकतात. एखाद्या आजाराचे अचूक निदान करण्यासाठीदेखील इंटरनेटचा उपयोग होतो.

**ई–कॉमर्स :** सन १९९५ साली कोणत्याही व्यक्तीने विचार केला नसेल, की आपण इंटरनेटच्या माध्यमातून कोणत्याही वस्तूची किंवा पुस्तकाची विक्री करू शकतो; पण जेफ बेझोस यांनी इंटरनेटच्या माध्यमातून पुस्तकांची विक्री करण्यास सुरुवात केली. आज ॲमेझॉन ही जगातील पहिल्या क्रमाकांची ई–कॉमर्स कंपनी आहे.

**शिक्षण क्षेत्र :** इतर क्षेत्रांप्रमाणे आज शिक्षण क्षेत्रातदेखील इंटरनेटचा अधिक प्रमाणात उपयोग केला जात आहे. ऑनलाईन परीक्षा, क्लासेस यांसाठी इंटरनेटचा वापर वाढला आहे. तसेच दूरस्थ शिक्षण पद्धतीमध्येदेखील याचा वापर वाढलेला दिसून येतो. विविध शाखांतील कोर्स करण्यासाठी, प्रशिक्षित शिक्षकांकडून शिक्षण घेण्यासाठीदेखील इंटरनेटचा वापर केलेला दिसून येतो.

**बँक :** आज बँकेतून पैसे काढण्यासाठी किंवा नवीन खाते उघडण्यासाठी बँकेत जाण्याची गरज भासत नाही, कारण या सगळ्या सुविधा आता इंटरनेटमुळे घरबसल्या शक्य झाल्या आहेत. आज आपण इंटरनेटच्या माध्यमातून बँकेतील अनेक व्यवहार रांगेत ताटकळत उभे न राहता करू शकतो. घरबसल्या काम करणाऱ्या व्यक्तींसाठी इंटरनेटने काम सोपे केले आहे. आज कोणतीही माहिती त्यांना क्षणात उपलब्ध होऊ शकते.

सन १९६९ मध्ये पहिल्या इंटरनेट कनेक्शनच्या वर्धापन दिनानिमित्त दि. २९ ऑक्टोबर, २००५ रोजी पहिला 'आंतरराष्ट्रीय इंटरनेट दिवस' साजरा करण्यात आला. या महान शोधाचा प्रचार करण्यासाठी आणि १९६९ मध्ये झालेल्या पहिल्या इंटरनेट कनेक्शनच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी 'आंतरराष्ट्रीय इंटरनेट दिवस' साजरा केला जातो. जगभरातील मोठ्या संख्येने लोक अजूनही इंटरनेटचा वापर करत नसल्यामुळे सर्वांसाठी इंटरनेटची मागणी करण्याचा हा दिवस आहे.

१९६९ पासून इंटरनेट युगाची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. तेव्हा अर्पानेट (Arpanet) मुळे अशा जाळ्याची कल्पना समोर आली. याच वेळी युनिक्स (Unix) सारख्या अद्ययावत ऑपरेटिंग सिस्टिमची सुरुवात झाली. ही सिस्टिम आजदेखील वेब सर्व्हरसाठी एक उत्तम प्रणाली मानली जाते. सन १९७० मध्ये पहिल्या ई–मेलची निर्मिती झाली. ई–मेलची निर्मिती करणाऱ्या रे टॉमलिन्सन यांनी तेव्हा ई–मेलमध्ये @ हे चिन्ह वापरण्याचा निर्णय घेतला होता. सन १९७१ मध्ये इंटरनेटवर गटेनबर्ग आणि ई–बुक हे दोन नवीन प्रकल्प आले. गटेनबर्ग यामध्ये माहितीचे भांडार आणि ई–बुकमध्ये चित्रस्वरूपात (स्कॅन इमेजेस) पुस्तके संग्रहित करण्यात आली. यानंतर १९७४ च्या सुरुवातीला टीसीपी/आयपी (TCP/IP) चा वापर केला गेला. 'हायपरटेक्स्ट ट्रान्सफर प्रोटोकॉल' (HTTP) हे सर्वांत सामान्यपणे वापरले जाणारे TCP/IP ॲप्लिकेशन आहे, कारण ते वेब पेजेस वेब सर्व्हरवरून वेब ब्राउझरवर ट्रान्सफर करते. वेब पृष्ठे HTML वापरून लिहिली जातात, ज्याचा अर्थ 'हायपर टेक्स्ट मार्कअप लँग्वेज' आहे. दुसऱ्या शब्दांत, एचटीटीपीचा वापर एचटीएमएल

फाइल्स ट्रान्सफर करण्यासाठी केला जातो. सर्व नेटवर्कमध्ये केंद्रीय नियंत्रण असावे हा यामागचा उद्देश पुढे टिसीपी/आयपीने यशस्वी झाला.

१९७५ मध्ये जॉन विंटल यांनी ई-मेलमध्ये नवीन सुधारणा आणल्या. त्यामुळे ई-मेलला उत्तर देणे व आलेला ई-मेल दुसऱ्याला पाठविणे, या महत्त्वाच्या गोष्टी शक्य झाल्या. पदवी अभ्यासक्रमाच्या दोन विद्यार्थ्यांनी बनविलेल्या यूजनेट प्रणालीद्वारे जगभरातील लोक इंटरनेटच्या माध्यमातून एकमेकांशी चर्चा करू शकतात. सन १९८२ मध्ये प्रथमच चिन्हाद्वारे प्रतिक्रिया दाखविण्याची सुरुवात झाली. १९८७ मध्ये इंटरनेटचे जवळपास ३०,००० धारक होते, तर १९८८ मध्ये इंटरनेटवरील गप्पागोष्टींचे पहिले सहक्षेपण (Internet Relay Chat) केले गेले. आज त्याला 'चॅटिंग' असे म्हणतात. १९८८ मध्ये इंटरनेटवर पहिल्या उपद्रवी प्रोग्रॅमने हल्ला चढवून मोठ्या अडचणी निर्माण केल्या. १९८९ मध्ये अमेरिका ऑनलाईन म्हणजेच AOL (America Online) ची निर्मिती झाली. AOL मुळे पुढील काळात इंटरनेट बर्नर-ली यांनी अस्तित्वात आणली. मात्र ती खऱ्या अर्थाने १९९० पासून सुरू झाली. १९९० या वर्षामध्ये इंटरनेटच्या क्षेत्रामध्ये बऱ्याच प्रमाणात प्रगती झाली. त्या वर्षी 'द वर्ल्ड' या पहिल्या व्यावसायिक डायल-अप इंटरनेट सेवा पुरविण्याची सुरुवात झाली. १९९१ मध्येच इंटरनेटवरील पहिले पान म्हणजेच वेब पेज बनविले गेले. १९९० मध्येच 'ग्रोफर' या पहिल्या शोधप्रणालीची निर्मिती झाली. ती फक्त फाईलचे नावच नाही, तर त्यातील मजकूरदेखील शोधत असे. याच वर्षी एमपी-थ्री (MP3) या प्रकाराला सर्वमान्यता मिळाली. हा फाईलचा प्रकार आजदेखील आवाजाच्या आणि गाण्याच्या फाईलसाठी जगप्रसिद्ध आहे. १९९१ मध्येच इंटरनेटवरील अतिमहत्त्वाचा टप्पा असलेल्या पहिल्या वेबकॅमचा म्हणजेच ऑनलाईन कॅमेऱ्याचा केंब्रिज विद्यापीठामध्ये वापर केला गेला.

**इंटरनेटचा शैक्षणिक उपयोग :**

**माहितीचे भांडार – इंटरनेट :** इंटरनेटवर सगळ्यांशी संबंधित आणि दर्जेदार सामग्री उपलब्ध आहे. अभ्यासाशी संबंधित सर्व साहित्य इंटरनेटवर उपलब्ध आहे. जनसामान्य लोकांना इंटरनेटची मदतदेखील मिळते. संशोधनासाठी कोणतीही व्यक्ती इंटरनेट वापरू शकते. इंटरनेटवर लाखो शोधनिबंध आणि पुस्तके उपलब्ध आहेत. पारंपरिक पद्धतीप्रमाणे माहिती शोधण्यासाठी मोठ्या पुस्तकांचा अभ्यास करणे खूप कठीण जात होते. आता इंटरनेटमुळे माहितीचे भांडार उपलब्ध झाले आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांचा खूप मूल्यवान वेळ वाचतो आहे. इंटरनेटच्या उदयानंतर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी संदर्भ साहित्य शोधणे खूप सोपे झाले आहे. आता ते त्यांचे अभ्यासाचे साहित्य इंटरनेटवर सहज शोधू शकतात.

**इंटरनेटच्या मदतीने करिअर प्लॅनिंग :** योग्य वेळी योग्य व्यावसायिक करिअर निवडणे विद्यार्थ्यांसाठी खूप अवघड असते, कारण विद्यार्थी स्तरावर त्यांना भविष्यात त्यांच्या आवडी आणि उद्दिष्टे काय असतील हे समजत नसते, पण इंटरनेटवर हजारो ब्लॉग आणि लेख उपलब्ध आहेत, जे यशस्वी लोकांनी लिहिलेले आहेत. यांमुळे विद्यार्थी आपले करिअर सहज निवडू शकतात.

**इंटरनेटद्वारे ऑनलाईन शिक्षण :** कोरोना काळात इंटरनेटमुळे 'शाळा बंद; पण शिक्षण चालू' हे चित्र आपण अनुभवलेले आहे. सारे जग बंद असताना इंटरनेटमुळे आपण एकमेकांशी संवाद साधू शकत होतो. शिक्षकांनी पाठवलेल्या ऑनलाईन प्रश्नमंजूषा, विविध

माहिती यांमुळे विद्यार्थी अभ्यास करण्यास सहज प्रवृत्त होत होते. आजकाल जगातील बरीच महाविद्यालये आणि विद्यापीठे ऑनलाईन शिक्षण देतात. व्हर्च्युअल क्लासेसच्या माध्यमातून ते घरबसल्या सहज अभ्यास करू शकतात.

**शोधात इंटरनेटची मदत :** संशोधनात विद्यार्थ्यांना इंटरनेटची मदत होते. विद्यार्थी इंटरनेटवर आपल्याला पाहिजे असलेल्या माहितीचा शोध सहज घेऊ शकतात. इंटरनेटवर लाखो वेबसाइट्स आणि ब्लॉग्स उपलब्ध आहेत; जे लोकांना शिकण्यात मदत करण्यासाठी उत्तम दर्जाची सामग्री शेअर करतात आणि प्रकाशित करतात.

**इंटरनेटवरून स्व-अभ्यास :** स्व-अभ्यासात इंटरनेट खूप महत्त्वाची भूमिका बजावते. google, bing, yahoo यांसारखी सर्च इंजिने तुम्हांला उत्तम ज्ञान देतात. इंटरनेटमुळे कोणीही शिकू शकतो आणि बरेच ज्ञान मिळवू शकतो. विद्यार्थी कधीही इंटरनेटवर त्यांना पाहिजे असलेली माहिती शोधू शकतात. यू-ट्यूबवर तुम्हांला हवे ते कोर्सेस उपलब्ध होतात. इंटरनेटला ज्ञानाचे जग म्हटले जाते. विद्यार्थी इंटरनेटवर त्यांचे अपेक्षित अभ्यास-साहित्य सहज शोधू शकतात. इंटरनेटच्या आधी विद्यार्थ्यांना कोणतेही संबंधित साहित्य शोधणे खूप कठीण होते. वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके वाचायची, पुस्तके घेण्यासाठी ग्रंथालयात जायचे, शिक्षकांकडे मदत मागायला जायचे इत्यादी, पण इंटरनेटमुळे त्यांना अशा प्रकारच्या समस्यांना तोंड देण्याची गरज नाही. वेगवेगळ्या सर्च इंजिनवर हव्या त्या गोष्टी ते सहज शोधू शकतात.

**इंटरनेटद्वारे कनेक्टिव्हिटी आणि संप्रेषण :** इंटरनेट विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना एकमेकांशी संपर्क आणि संवाद साधण्यात मदत करते. इंटरनेटच्या मदतीने विद्यार्थी आणि शिक्षक एकमेकांशी संवाद साधू शकतात. हे बऱ्याच विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना व्हर्च्युअल मोडमध्ये शिक्षणाशी संबंधित सामग्रीवर सहजपणे चर्चा करण्यास मदत करते. विद्यार्थी फेसबुक, व्हॉट्सअॅप इत्यादी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन गट बनवू शकतात आणि गटांमध्ये माहिती सामायिक करू शकतात. सोशल मीडिया प्लॅटफॉर्ममध्ये आपण प्रत्येक क्षेत्रातील सर्वोत्तम तज्ज्ञ व्यक्ती शोधू शकतो.

**स्वाध्याय व सादरीकरणाकरिता :** विद्यार्थी त्यांचा अवघड स्वाध्याय पूर्ण करण्यासाठी इंटरनेटची मदत घेऊ शकतात. विद्यार्थी इंटरनेटची मदत सहज मिळवू शकतात आणि स्वाध्याय वेळेवर पूर्ण करू शकतात.

**विनामूल्य शिक्षण :** विद्यार्थ्यांसाठी सर्वांत कठीण गोष्ट शिक्षणासाठी लागणारा पैसा. फी, पुस्तके, अन्य शैक्षणिक साहित्य उपलब्ध असणे. दुसऱ्या शहरात राहावे लागणार असेल, तर वसतिगृहाचा खर्च असतो. यासाठी काहींना खूप संघर्ष करावा लागतो. मात्र इंटरनेटमुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिकणे खूप सोपे झाले आहे. विद्यार्थी या कोर्सेसमध्ये सहज नावनोंदणी करू शकतात आणि पैसे वाया न घालवता घरबसल्या ऑनलाईन शिकू शकतात. त्यांना बरीच पुस्तके, नोट्स आणि मासिके सॉफ्ट फॉर्ममध्ये ऑनलाईन विनामूल्य मिळू शकतात.

**जलद अपडेट आणि नवीन माहिती :** इंटरनेट हा नवीन माहितीचा चांगला स्रोत आहे. इंटरनेट तुम्हांला हवी असलेली नवीन माहिती पुरवते. आपल्याला आवश्यक असलेली नवीन माहिती प्रदान करणाऱ्या बऱ्याच वेबसाइट्स आहेत. इंटरनेटच्या आधी, लोक स्वतःला अपडेट करण्यासाठी वर्तमानपत्राची वाट पाहात होते. मात्र इंटरनेटनंतर रोजच्या वर्तमानपत्रांची वाट पाहण्याची गरज नाही. त्यांना जगभरात चाललेल्या सर्व गोष्टी कळतात. लोक इंटरनेटद्वारे स्वतःला सतत अपडेट करू शकतात.

इंटरनेट हे संगणकाद्वारे जगभर पसरलेल्या कित्येक नेटवर्कला जोडले गेले आहे. इंटरनेट हे अनेक नेटवर्कचे जाळे आहे. एक प्रकारे इंटरनेट हे सॅटेलाइट आणि टॉवरच्या मदतीने जगभरातील डिजिटल उपकरणांशी जोडले गेले आहे. आज जगभरातील संपूर्ण वेब सर्व्हर इंटरनेटमुळे जोडले गेले आहेत. आजचा इंटरनेटचा स्पीड पाहता, आधी हा वेग खूपच कमी होता. आज आपण इंटरनेटचे हे महाकाय जाळे पाहत आहोत. इंटरनेटबद्दल महत्त्वाची बाब म्हणजे इंटरनेट जितके फायदा देते, तितके त्याचे दुष्परिणामदेखील आहेत. यासाठी पुढीलप्रमाणे काळजी घेणे गरजेचे आहे.

**इंटरनेट वापरताना कोणती काळजी घ्यावी :** आज आपण इंटरनेटचा वापर विविध कारणांसाठी करत आहोत. असा एकही दिवस नसतो, की ज्या दिवशी आपण इंटरनेटचा वापर केला नाही. इंटरनेट आपल्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनले आहे. इंटरनेटवर माहिती शोधत असताना अथवा माहिती घेत असताना इतरांचा आदर राखणेदेखील महत्त्वाचे असते. इंटरनेटचा वापर करताना शिष्टाचार पाळला जावा, ही अपेक्षा असते. त्यालाच 'नेटिकेट' (इंटरनेट शिष्टाचार) असे म्हणतात. इंटरनेटचा वापर करत असताना कोणत्या गोष्टी कराव्यात व कोणत्या करू नयेत यांविषयी आपण माहिती घेऊ.

- इंटरनेटचा वापर करताना इतरांच्या गोपनीयतेचा, भावनांचा आदर करा.
- अपमानास्पद किंवा बेकायदेशीर काही दिसले, तर लगेच त्याची तक्रार करा.
- इंटरनेटवरून सॉफ्टवेअर, गेम, चित्रपट, संगीत, फाईल किंवा माहिती डाउनलोड करताना, कॉपीराइट निर्बंधांचे पालन करा.
- जेव्हा तुम्ही इतरांशी ऑनलाईन संवाद साधता/गप्पा मारता तेव्हा उपनाम/पर्यायी नाव/वापरकर्ता म्हणून वापर करा.
- शिक्षक आणि पालक किंवा ज्यांच्यावर तुम्ही विश्वास ठेवता, त्यांना त्वरित ऑनलाईन गुंडगिरीची किंवा अनुचित प्रकाराची माहिती द्या किंवा तक्रार करा.
- प्रत्येक खात्यासाठी संख्या, अप्परकेस आणि लोअरकेस अक्षरे आणि विशेष वर्णांच्या संयोगांसह एक मजबूत आणि अद्वितीय पासवर्ड वापरावा.
- ब्राउझर, ऑपरेटिंग सिस्टिम आणि अँटिव्हायरस अद्ययावत ठेवा.
- विश्वसनीय स्रोतांकडून सॉफ्टवेअर मिळवा. फाईल्स उघडण्यापूर्वी त्या नेहमी स्कॅन करा.
- संगणक/टॅब्लेट/फोन वापरणे पूर्ण झाल्यावर स्क्रीन लॉक करा. ऑटो लॉक सेट करा.
- जेव्हा आपण ऑनलाईन साइन इन करता, तेव्हा वेब पत्ता https:// ने सुरू होतो का ते तपासा.
- सोशल मीडियाच्या खात्यांमध्ये गोपनीयता सेटिंग्ज अशा प्रकारे बनवा, की प्रोफाइल आणि पोस्ट फक्त जवळच्या मित्रांना आणि परिचित व्यक्तींनाच दिसतील.
- तुमच्या डिजिटल प्रतिष्ठेबद्दल जागरूक राहा. काही तरी लाजिरवाणे, हानिकारक किंवा अयोग्य गोष्ट पोस्ट करण्यापूर्वी अनेक वेळा विचार करा.
- खाते हॅक झाल्यास त्वरित सेवा प्रदात्यास कळवा. शक्य असल्यास तुमचे खाते निष्क्रिय करा.

### पुढील गोष्टी टाळूया

- तुमची वैयक्तिक माहिती शेअर करू नका. जसे तुमचे खरे नाव, जन्मतारीख, फोन नंबर इत्यादी.

- तुमचे फोटो अज्ञात व्यक्तींना पाठवू नका किंवा त्यांना सोशल मीडियावर शेअर करू नका.
- अनोळखी लोकांकडून ईमेल आणि पाठवलेल्या फाईल्स उघडू नका.
- कोणत्याही संशयास्पद ई-मेल, इन्स्टंट मेसेज किंवा वेबपृष्ठाला वैयक्तिक माहिती विचारल्यास प्रतिसाद देऊ नका.
- जेव्हा कोणी तुमच्या शेजारी बसले असेल, तेव्हा पासवर्ड टाकू नका, कारण ते तुमचा पासवर्ड पाहू शकतात.
- तुमचा पासवर्ड कोणाशीही शेअर करू नका.
- तुमचे वापरकर्ता नाव (User Name) आणि पासवर्ड ब्राउझरवर सेव्ह करू नका.
- इतरांची माहिती चोरू नका.
- ज्याची फाईल आहे, त्याच्या परवानगीशिवाय फाईलमध्ये प्रवेश करू नका किंवा वापरू नका.
- लेखकाच्या परवानगीशिवाय कॉपीराइट असलेले सॉफ्टवेअर कॉपी करू नका.
- इतरांना छेडछाड करून, धमकी देऊन, असभ्य किंवा अक्षेपार्ह भाषा वापरून, अपमानास्पद किंवा द्वेषपूर्ण टिपण्या करून इतरांना धमकावू नका.
- दुसऱ्याचा पासवर्ड तुमच्यासोबत शेअर केला असला, तरीही वापरू नका.
- इतर कोणत्याही ठिकाणी 'ई-मेल' वाचण्यासाठी 'लॉग इन' करू नका, तसेच इतरांचे मेल वाचण्यासाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी त्यांच्या प्रोफाइलमध्ये गडबड करू नका.
- दुसऱ्याच्या संगणकावर 'लॉग इन' करू नका किंवा आपली माहिती अनोळखी व्यक्तीला देऊ नका.
- अज्ञात स्रोताकडून आलेली कोणतेही Attachment उघडू नका किंवा डाउनलोड करू नका, कारण त्यात व्हायरस असू शकतो.
- अशा प्रकारे आपण इंटरनेटचा वापर करताना वरील गोष्टींची काळजी घेतली, तर नक्कीच आपली माहिती, गोपनीय व सुरक्षित राहील. यामुळे इंटरनेटचा योग्य वापर होऊन, प्रगती करण्यासाठी निश्चितच साहाय्यभूत ठरेल.

■■■

**(पृष्ठ क्र. ८ वरून)**

(४) वर्गस्तरीय वाचनालयामुळे पालकांनासुद्धा पुस्तके वाचण्यास उपलब्ध झाली. त्यामुळे शाळेसोबत घरांमध्येसुद्धा वाचनसंस्कृती रुजण्यास मदत झाली.

(५) मुलांमध्ये पुस्तक वाचनाची आवड निर्माण झाली, शिवाय त्यांची वाचनगती वाढली. त्यांच्या आकलनशक्तीमध्ये तसेच ज्ञानात वृद्धी झाली.

■■■


## वर्गणीदार होण्यासाठी

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) आहे.

**https://scertmaha.ac.in/ jeevanshikshan/**

**या लिंकवर जाऊन तसेच क्यूआर कोड स्कॅन करून सुद्धा तुम्ही वर्गणीदार होऊ शकता.**

**संपर्क : jeevanshikshan@maa.ac.in**

# वृत्तपत्र वाचूया, संस्कारधन वेचूया!

**अंजली गोडसे**
जि. प. प्राथ. शाळा बिरामणेवाडी,
ता. जावळी, जि. सातारा

*एक दुर्गम भागातील शाळा. शाळेत मुलांची संख्या कमी. सोयी-सुविधांचा अभाव. अशा ठिकाणी वाचन संस्कारासाठी दैनिक वृत्तपत्राचा वापर करून, वाचन कौशल्याच्या विकसनाबरोबरच, वृत्तपत्राचा विविधांगी वापर करून, वर्गात जे अनेक उपक्रम राबवले, त्याचा परिचय करून देणारा लेख.*

शाळा म्हणजे मुलांना घडविणारे एक ज्ञानरूपी प्रेमाचे घर आणि या घरातील आई म्हणजेच शिक्षक होय. विद्यार्थी हेच तर प्रत्येक शिक्षकाचे दैवत असते. बालमन संस्कारक्षम असते. या वयात झालेले संस्कार कायमस्वरूपी टिकणारे असतात. मुलाच्या शिक्षणाचा 'श्रीगणेशा' प्राथमिक शाळेत होत असतो. यामुळेच प्राथमिक शिक्षणाला खूपच महत्त्व प्राप्त झाले आहे. उद्याचा नागरिक आदर्श, सुसंस्कारित, समंजस, चारित्र्यसंपन्न घडायचा असेल, तर प्राथमिक शिक्षण दर्जेदार मिळाले पाहिजे. असे शिक्षण मिळणे हा प्रत्येक विद्यार्थ्याचा हक्क आहे. शाळेत फक्त अध्ययन-अध्यापन एवढीच प्रक्रिया अपेक्षित नाही, तर मुलांना घडविण्यासाठी, त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी विविध नवोपक्रम राबवणे आवश्यक आहे.

आजचे युग हे जागतिकीकरणाचे युग आहे, पण अजूनही काही गावे या जागतिकीकरणापासून खूपच दूर आहेत. सोशल मीडियाची साधी ओळख नसणारे अनेक लोक अजूनही खेड्यापाड्यांत दिसून येतात. माझ्या शाळेचे गाव बिरामणेवाडी. या गावाची वस्ती फक्त तीस-चाळीस घरांची आहे. त्यामुळे शाळेची पटसंख्याही कमीच आहे. गावात एस.टी. नाही, किराणा मालाचे दुकान नाही. कुठे जायचे म्हटले, की सहा ते सात किमी. पायपीट करावी लागते. अशा गावात रोजचे वर्तमानपत्र कसे वाचावयास मिळणार? या समस्येतूनच माझ्या डोक्यात एक सुंदर कल्पना आली. त्या कल्पनेचे मूर्तरूप म्हणजेच माझा हा नवोपक्रम 'वृत्तपत्र वाचूया, संस्कारधन वेचूया'. शाळेमध्ये दैनिक वर्तमानपत्र मीच घेऊन येऊ लागले. सुरुवातीला मुलांसाठी दैनिक परिपाठ तसेच वाचनकट्ट्यासाठी वर्तमानपत्राचा वापर झाला. पालकांसाठीसुद्धा वाचनकट्टा सुरू केला. पालकांचा, ग्रामस्थांचा नवोपक्रमातील, शाळेच्या चांगल्या गोष्टीतील सहभाग वाढविण्यासाठी पण हा उपक्रम सुरू केला. वृत्तपत्रांमधून येणाऱ्या, विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयोगी असलेल्या शैक्षणिक सदरातील माहितीची कात्रणे मुलांना जमवावयास सांगितली. मुलांनी सुंदर असा कात्रण-संग्रह तयार केला. त्यातूनच दिवाळी सुट्टीत कृतियुक्त अभ्यास देण्यात आला. यातूनच छान अशा शैक्षणिक संग्रहाची निर्मिती झाली. वर्तमानपत्राच्या शिल्लक राहिलेल्या कागदातून कलाकुसरीच्या विविध प्रकारच्या वस्तू बनवून घेतल्या.

अशा प्रकारे वेचलेल्या या संस्कारधनाच्या ज्ञानरूपी भांडारातून आज माझे विद्यार्थी संस्कारधन आत्मसात करीत असल्याचा मला अभिमान वाटत आहे. विद्यार्थ्यांबरोबरच माझे पालकही, त्यांच्या उपलब्ध वेळेनुसार वाचनाचा आनंद घेऊन शाळेच्या उपक्रमास सहकार्य करीत आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

होऊन विद्यार्थी परिपूर्ण होणे हेच प्रत्येक शिक्षकाचे ध्येय असते. या दृष्टीने उचललेले हे एक पाऊल.

जि. प. प्राथ. शाळा बिरामणेवाडी येथे 'दप्तराविना शाळा' हा प्रकल्प राबवला जात होता. त्यामध्ये विविध उपक्रम घेतले जात होते. तसे पाहायला गेले, तर बिरामणेवाडी शाळेचा परिसर निसर्गसंपन्न असा असला, तरी दळणवळणापासून दूर, डोंगरकपारीचा असा आहे. गावात कोणाकडेच वृत्तपत्र येत नव्हते, त्यामुळे चालू घडामोडींची माहिती मुलांना आणि ग्रामस्थांना मिळत नव्हती. आपणच काहीतरी करावे असा विचार करून, मी माझ्या घरी येत असलेले वर्तमानपत्र नित्यनेमाने शाळेत आणू लागले. शाळेत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी नवनवीन संकल्पना उपक्रमांच्या माध्यमातून राबवण्याची धडपड चालूच होती. शाळेत वृत्तपत्राचा नियमित वापर करता करता मनात आले, की यातून विद्यार्थ्यांसाठी आणि येथील ग्रामस्थांसाठी एक आगळावेगळा उपक्रम करता येईल आणि यातूनच 'वृत्तपत्र वाचूया, संस्कारधन वेचूया' या उपक्रमाने मूर्त रूप धारण केले आणि त्याची कार्यवाही पुढीलप्रमाणे केली.

**(१) परिपाठ :** कोणत्याही शाळेतील प्रत्येक दिवसाची सुरुवात सुंदर व आदर्श परिपाठाने होते. ज्या शाळेचा परिपाठ चांगला होतो, त्याच शाळेतील दिवसभराचे सर्व उपक्रम, अध्यापन हे चांगलेच होते. म्हणतात ना, 'दिवसाची 'चांगली सुरुवात निम्मे काम यशस्वी करते.' परिपाठामध्ये विविध, नावीन्यपूर्ण उपक्रमांची रेलचेल असते. आम्ही यामध्ये वर्तमानपत्राचा सुयोग्य वापर करून घेतो. वर्तमानपत्रात येणारे पंचांग हे सदर अतिशय उपयुक्त ठरले. तसेच 'आजच्या ताज्या बातम्या' यामध्ये जगभरात घडणाऱ्या ताज्या आणि विधायक घडामोडींची मुलांना माहिती करून दिली जाते. त्याबरोबरच सामान्य ज्ञान, बोधकथा, सुविचार, संतवाणी अशा विविध भागांचा उपयोग करून मूल्यांची रुजवणूक केली जाते. दिवसाची सुरुवातच अशी सुंदर होऊन मुलांचा संपूर्ण दिवस आनंदात जातो.

**(२) वाचन कोपरा :** प्रत्येक शाळेमध्ये एक वाचन कोपरा असतोच. यामध्ये वाचनासाठी विविध प्रकारचे साहित्य ठेवलेले असते. मी पण माझ्या शाळेत मुलांसाठी असाच एक वाचन कोपरा तयार केला आहे. यामध्ये शाळेत वर्तमानपत्र वाचनासाठी एक स्टँड तयार करून घेतला; जेणेकरून मुलांना सुट्टीच्या वेळेत उभे राहून त्यांच्या आवडीनुसार वर्तमानपत्राचे वाचन करता येईल. वाचन-स्टँड पाहिजे त्या ठिकाणी हलवता येत असल्यामुळे, मुलांना हव्या त्या ठिकाणी तो स्टँड ठेवता येत असल्यामुळे मुले सुट्टीत त्यांच्या सवडीने निसर्गाच्या सान्निध्यात वर्तमानपत्र वाचू लागली. शाळेला भेटी देणारेही वर्तमानपत्राच्या वाचनाचा आनंद घेऊ लागले.

**(३) एक तास वाचन पालकांसाठी :** पालकांचा शाळेतील सहभाग वाढविण्यासाठी आपण सर्व जण वेगवेगळे उपक्रम शाळेत राबवत असतो. पालकांनाही शाळेत येऊन वर्तमानपत्रे वाचता यावीत, यासाठी दर शनिवारी सकाळी ९ ते १० हा एक तास, पालकांसाठी आठवडाभरातील सर्व वर्तमानपत्रे वाचनासाठी ठेवण्यात आला. शनिवारी 'दप्तराविना शाळा' हा उपक्रम शाळेत राबवीत असल्यामुळे त्या उपक्रमांमध्ये पालकांचे सहकार्य मिळू लागले. शाळेमध्ये सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती पालकांना करून देता आली. विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्यात या उपक्रमामुळे आंतरक्रिया घडून आली.

**(४) वृत्तपत्र वाचूया संस्कारधन वेचूया :** वृत्तपत्रे हा मानवी जीवनाचा एक आवश्यक घटक आहे; म्हणूनच वृत्तपत्राला लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हटले जाते. रोजच्या ताज्या घडामोडी घेऊन येणारे वृत्तपत्राचे स्थान आजही, माहिती तंत्रज्ञानाच्या युगात अनेक वेगवान प्रसारमाध्यमे असतानाही टिकून आहे. आज एकविसाव्या शतकातही वृत्तपत्रांचे महत्त्व अबाधित आहे. दर शनिवारी आठवड्यात जमा झालेल्या विविध सदरांमधील महत्त्वपूर्ण माहितींची कात्रणे काढून त्यांचा संग्रह करण्यात आला. यामुळे मुलांमधील संग्रहवृत्ती तसेच वेचक वृत्ती वाढण्यास मदत झाली. मुले वर्तमानपत्रांचे वाचन करत असतानाच त्यातील संस्कारधनही वेचू लागली.

**(५) वर्तमानपत्रांच्या रद्दीतून कार्यानुभव संकल्प सिद्धी :** शनिवारी घेण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या नियोजनानुसार शाळेतील मुलांनी वर्तमानपत्रांत येणाऱ्या विविध प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू माझ्या मार्गदर्शनाखाली तयार केल्या व त्याचे प्रदर्शन शाळेतील शिक्षण परिषदेमध्ये भरविण्यात आले. सर्व शिक्षणाधिकाऱ्यांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. यामध्ये पुस्तकांना कव्हर घालणे, तसेच फुलपाखरे, होड्या, कागदी टोप्या, फोटो फ्रेम असे विविध कलाकुसरीचे साहित्य विद्यार्थ्यांकडून बनवून घेतले. 'प्लॅस्टिक मुक्तीचा' संदेश देण्यासाठी वर्तमानपत्राच्या कागदी पिशव्या बनवून घेतल्या आणि त्या विद्यार्थ्यांना वापरण्यास दिल्या. अशा प्रकारे विविध प्रकारच्या वस्तू बनवून शिल्लक राहिलेल्या वर्तमानपत्राचा लगदा तयार करून त्यापासून उठावाचे नकाशे तसेच विविध आकारातील वस्तू बनवून घेतल्या. अशा प्रकारे विविध शैक्षणिक उपक्रमांसाठी वर्तमानपत्राचा पुरेपूर वापर करून घेता आला.

**(६) कृतियुक्त शिक्षणातून घेऊ सुट्टीची मजा :** दरवर्षी आपण सर्व जण आपल्या विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुट्टीत 'दिवाळी अभ्यास' देतो. आमच्या शाळेतील मुलांना मी या दिवाळी अभ्यासाबरोबरच आणखी एक कृतियुक्त अभ्यास दिला आणि सर्व पालकांना याची पूर्वकल्पना दिली. विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रातील महत्त्वपूर्ण माहिती व बातम्यांच्या कात्रणांचा केलेला संग्रह एकत्र करावयास सांगितला. त्या कात्रणांचे विषयवार वर्गीकरण करून घेतले. प्रत्येकाला वेगवेगळ्या विषयांवरील बातमीची, माहितीची कात्रणे देऊन वहीत व्यवस्थित चिकटवून सुट्टीनंतर शाळेत येताना आणावयास सांगितले. विद्यार्थ्यांना कात्रणांचा संग्रह करताना खूप मजा आली. विद्यार्थ्यांनी दिलेल्या सर्व कात्रणांचा सुंदर संग्रह करून छान–छान पुस्तिका तयार केल्या. त्या प्रत्येक पुस्तिकेला तिच्यातील वैशिष्ट्यपूर्ण कात्रणांच्या माहितीवरून नावे देण्यात आली. यामध्ये 'वचनामृत', 'हटके वाटा', 'रानावनात', 'खाऊचा डबा', 'लेट्स प्ले', 'सामान्य ज्ञान', 'आर्ट ॲण्ड क्राफ्ट', 'कडेलोट', 'सुविचार संग्रह', 'हटके स्ट्रोक', 'नवलाईच्या गोष्टी', 'असे घडलो आम्ही', 'जंगलकन्या', 'हिरवे दोस्त', 'बोधामृत', 'बडबडगीते', 'साध्या–साध्या गोष्टी', 'थेंबे–थेंबे', 'बना मावळे, चला खेळूया', 'मजेत शिकत जगा' अशी अनेक प्रकारची पुस्तके तयार झाली. यामध्ये पालकांनी आवडीने सहभाग घेतला. कृतीतून घेतलेले शिक्षण कायमस्वरूपी स्मरणात राहते. मुले स्वतःच संकलन करून संग्रह करू लागली. शाळेत भरलेल्या 'शिक्षण परिषदे'मध्ये या उपक्रमांच्या पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले. सर्वांनी कौतुक करून भरभरून शुभेच्छा दिल्या.

■■■

# कल्पक श्रावण

**शिल्पा वनमाळी**
जि. प. प्राथ. शाळा आगवन
नवासाखरा, जि. पालघर.
भ्रमणध्वनी : ९९२३८७१२७९

*श्रावण महिना हा सर्वांच्या आवडीचा. या महिन्यात अनेक सण, उत्सव असतात. श्रावण महिन्यात निसर्गाला बहर आलेला असतो. सगळीकडे आनंदीआनंद असतो. श्रावणातल्या विविध पारंपरिक सणांना आधुनिकतेची जोड देऊन नागपंचमीला सापांची वैज्ञानिक माहिती, दहीहंडीला दहीहंडीत चॉकलेट, बिस्किटांबरोबर, पाठ्यपुस्तकात अभ्यासल्या जाणाऱ्या घटकांशी संबंधित चिठ्ठ्या ठेवून त्यात दिलेल्या विषयावर विचार मांडण्याची संधी देणे अशा विविध उपक्रमांविषयी माहिती देणारा लेख.*

*'श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे,*
*क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे',*
*'श्रावणात घननिळा बरसला',*
*हासरा नाचरा सुंदर साजरा*
*आला आला श्रावण महिना आला...*

श्रावण, निसर्गाचे मनमोहक रूप. सर्वांना मंत्रमुग्ध करणारा असा हा महिना. नभो मंडपी सप्तरंगी इंद्रधनुचे तोरण, हिरवळीच्या, मखमली गालिच्यावर प्राजक्ताच्या फुलांची मनमोहक रांगोळी, रंगीबेरंगी फुलांची उधळण, जणू संपूर्ण सृष्टीच या लाडक्या श्रावण महिन्याच्या स्वागतासाठी सज्ज झाली आहे असे वाटू लागते.

श्रावणात ऊन–पावसाचा सुखकर लपंडाव अनुभवता आला. या महिन्यातच भारतीय संस्कृतीतील सण–उत्सवांची रेलचेल मोठ्या प्रमाणात असते. श्रावण महिन्याची सुरुवातच दाही दिशा प्रकाशमान करणाऱ्या, अंधकार दूर करणाऱ्या दीप अमावस्या या सणापासून होते. नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोपाळकाला वगैरे सणांची मांदियाळी असते जणू श्रावण महिन्यात.

या सर्व सण–उत्सवांचा आपल्या अध्यापनात कसा उपयोग करून घेता येईल, हा विचार माझ्या मनात डोकावला. नवकल्पना भरारी घेऊ लागल्या आणि सुरुवात झाली ती शालेय अध्यापनाला सण–उत्सवांची जोड या नावीन्यपूर्ण उपक्रमातून.

उद्दिष्ट होते विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आवड निर्माण करणे, त्यांची शंभर टक्के उपस्थिती टिकवणे, गळती रोखणे, अभ्यासक्रमातील सर्व विषयांचा समवाय साधणे, ज्ञानरचनावादी, कृतियुक्त, आनंददायी पद्धतीने अध्ययन–अध्यापनातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधणे आणि भारतीय संस्कृतीची जपणूक करून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये रुजवणे.

दीप अमावस्येला आम्ही विद्यार्थ्यांकडून मातीचे दिवे, कापसाच्या वाती बनवून घेतो. समई, निरांजन, पणती, लामणदिवा, कंदील, विजेचा दिवा, मेणबत्ती अशा दिव्यांच्या बहुविध प्रकारांची प्रत्यक्ष ओळख करून दिली जाते.

दीप अमावस्या साजरी करण्यामागचे पारंपरिक व शास्त्रीय महत्त्व  सांगितले जाते. दिवा जसा अंधकार दूर करून सर्वदूर प्रकाश पसरवतो, तसाच अज्ञानरूपी अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश सर्वदूर पसरवण्यासाठी विद्यार्थ्यांना ज्ञानाचे महत्त्व पटवून दिले जाते. नागपंचमी

सणाच्या दिवशीही विद्यार्थ्यांकडून मातीकाम या कार्यानुभावाशी निगडित घटकात मातीचे नागोबा बनवून घेतले जातात. नाग हा सरपटणारा प्राणी, शेतकऱ्यांचा मित्र असून शेतात होणारा उंदरांचा सुळसुळाट रोखण्यासाठी व शेतीचे नुकसान टाळण्यासाठी किती महत्त्वाचा आहे हे सांगितले जाते. नागाच्या विविध प्रकारांची ओळख प्रोजेक्टर, स्मार्ट टीव्हीच्या माध्यमातून, तसेच पुस्तकांच्या वाचनातून करून दिली जाते. नागपंचमीला मुली-माता जो पारंपरिक खेळ-झिम्मा, फुगडी खेळतात तो, त्यांच्याकडून खेळून घेतला जातो. 'चल ग सये वारुळाला, वारुळाला' अशा पारंपरिक गाण्यांची ओळख करून देण्यात येते.

बहीण-भावाच्या प्रेमाचा सण म्हणजे रक्षाबंधन. रक्षाबंधन सणासाठी विद्यार्थ्यांकडून टाकाऊ वस्तूंपासून इको फ्रेंडली राख्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली बनवून घेतल्या जातात. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या राख्या रक्षाबंधनाच्या दिवशी शाळेतील मुली, मुलांना बांधतात. अतिशय मंगलमय वातावरणात हा सोहळा पार पडतो. भावाने फक्त बहिणीचे रक्षण करणे इतकाच रक्षाबंधन सणाचा अर्थ नसून, आपण सर्वांनी आपली वसुंधरा; म्हणजेच पृथ्वी व त्यावर असणाऱ्या सर्व प्राणिमात्रांचे रक्षण करण्यासाठी प्रतिज्ञा घ्यायची. स्त्री-पुरुष समानता, प्रेम, आदर, जपणूक अशा मूल्यांची शिकवण यातून मिळते. शाळा परिसरातील वृक्षांना राख्या बांधून आमचे विद्यार्थी त्यांची जपणूक करण्याचे वृक्षबंधन घेतात, तसेच शाळेशेजारी असणाऱ्या कष्टकरी समाजातील स्त्री-पुरुषांनाही राख्या बांधून, विद्यार्थ्यांना त्यांच्या कामाचे महत्त्व समजावून दिले जाते. नारळी पौर्णिमा या सणाचे पारंपरिक वैज्ञानिक महत्त्व समजावले जाते. गोपाळकाला सणाला आमचे विद्यार्थी व आम्ही मिळून दहीहंडीसाठी वापरावयाच्या हंडीची आकर्षक सजावट करतो. शाळा पानाफुलांनी सजवली जाते. चॉकलेट, बिस्किटांनी भरलेली हंडी गोपाळकाल्याच्या सणाच्या दिवशी आमचे बालगोपाळ फोडतात. या हंडीत चॉकलेट, बिस्किटांसोबत पाठ्यक्रमातील घटकांच्या चिठ्ठ्या ठेवलेल्या असतात. विद्यार्थ्यांना चॉकलेट व बिस्किटांसोबत मिळालेल्या चिठ्ठीतील विषयांवर आपले विचार मांडण्यास सांगितले जाते. वर्षभरात येणारे पारंपरिक सण, राष्ट्रीय सण, स्थानिक उत्सव मोठ्या उत्साहात आमच्या शाळेत साजरे केले जातात. त्यातूनच भाषा, गणित, इंग्रजी, सामान्य विज्ञान, इतिहास, भूगोल, कला, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण अशा सर्व विषयांशी समवाय साधण्याचा आमचा प्रयत्न असतो. निबंध, वक्तृत्व, चित्रकला, रांगोळी स्पर्धा, गीतगायन असे विविध उपक्रम या अनुषंगाने घेतले जातात. सर्व सणांचे पारंपरिक, शास्त्रीय, भौगोलिक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले जाते. अशा प्रकारे भारतीय संस्कृतीतील नैतिक मूल्यांशी विद्यार्थ्यांची नाळ जोडली जाते. आपल्या सर्वांना ज्ञात आहेच, की आजचा विद्यार्थी हा आपल्या देशाचा भावी नागरिक आहे. ही भावी पिढी मूल्यसंस्कारित करण्याचा वसा आम्ही शिक्षकांनी घेतला आहे. देश प्रगतिपथावर नेण्यासाठी शालेय अध्यापनाला सण-उत्सवांची जोड या श्रावण महिन्यामध्ये अधिकाधिक दिली जाते. असा हा श्रावण महिना आम्हांला आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी वरदानच ठरतो.

■■■

# शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा व कलेचे महत्त्व

**मनोहर बाविस्कर**
हिमालय हायस्कूल बोरिवली, मुंबई.

आजच्या संगणकाच्या युगात चित्रकलेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. चित्रकला शिक्षणाचेही आता व्यापारीकरण झाल्यामुळे माहितीतंत्रज्ञानाचे महत्त्व आणि गरज याची विद्यार्थ्यांना जाणीव होऊ लागली आहे. विद्यार्थी भविष्यामध्ये मेडिकल, इंजिनिअरिंग किंवा कुठल्याही क्षेत्रामध्ये जात असेल, तर त्याला चित्रकला या विषयाचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे; कारण चित्रांच्या माध्यमातून विद्यार्थी व्यक्त होत असतात. स्वतःला अभिव्यक्त करत असतात. विद्यार्थ्यांची चित्रकला या विषयाची आवड जोपासण्यासाठी त्यांना ठरावीक पायाभूत ज्ञान असण्याची गरज असते, ही माहिती चित्रकला विषयातून त्याला होते. चित्रकलेच्या माध्यमातून विद्यार्थी स्वनिर्मितीचा व सर्जनशीलतेचा आनंद घेत असतो.

चित्रकलेचे शिक्षण हे एक विशिष्ट प्रकारचे शास्त्र आहे. बालवयापासून मुलांच्या मनावर कलेचे संस्कार घडविणे; म्हणजे खऱ्या अर्थाने चांगले सुसंस्कृत नागरिक बनविण्याचा विचार करणे हा या शास्त्राचा मूलभूत आधार आहे. सामान्य नागरिकांच्या मते, मुलांच्या पुढील आयुष्यात ज्यांना डॉक्टर, इंजिनिअर, व्हायचे आहे, त्यांना या विषयाचा फारसा उपयोग नाही, पण हा गैरसमज आहे. वस्तुस्थिती अशी आहे, की चित्रकला हा विषय नसून ती एक शिस्त आहे, की ज्यामधून इतर विषय योग्यप्रकारे शिकता येतात. मुलांना कलेद्वारे सुंदर गोष्टीत रमणे सहज शक्य होते. या पार्श्वभूमीवर विचार करता, शाळेत चित्रकला शिक्षणाचे महत्त्व आहे.

> *अभ्यासक्रमात चित्रकला हा विषय आहे. या विषयाकडे पारंपरिक पद्धतीने न पाहता विद्यार्थ्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडविणारी कला म्हणून तिचा अभ्यास व्हावा आणि विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी तिचा उपयोग व्हावा, या दृष्टीने महाराष्ट्र शासनामार्फत चित्रकला ग्रेड परीक्षा घेण्यात येतात. तंत्रज्ञान व इतर क्षेत्रात विद्यार्थ्यांना या कलेचा फायदा होईल यात शंका नाही, म्हणून प्रत्येक पालकाने आपल्या पाल्याला या परीक्षेला अवश्य बसवावे; जेणेकरून त्यांना त्याचे महत्त्व समजेल. एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा २०२३ ऑफलाईन स्वरूपात घेतली जाणार आहे. ही परीक्षा ०४ ऑक्टोबर, २०२३ ते ०७ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत घेण्यात येणार आहे.*

चित्रकलेच्या शासकीय एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचे टप्पे मानले जातात. या परीक्षांचा निकाल देताना A, B, C, अशाप्रकारे ग्रेड दिली जाते. A ग्रेड मिळालेल्या विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेत मिळालेल्या एकूण गुणात ०८ गुण जास्त दिले जातात, तर B ग्रेडला ०५ व C ग्रेडला ०३ गुण जादा दिले जातात. चित्रकला ग्रेड परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना टेक्सटाईल, डिझायनिंग, डेकोरेशन, इंटिरियर, फॅशन डिझाईनिंग, इंजिनिअरिंग किंवा तत्सम कोणत्याही क्षेत्रात जायचे असेल, तर त्यांना चित्रकला या विषयाचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच आर्किटेक्चर व इतर संबंधित तांत्रिक शाखांमध्ये प्रवेश देताना या परीक्षा

उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते, तसेच दहावी व बारावीच्या परीक्षेनंतर शासकीय कला महाविद्यालयात प्रवेश प्रक्रियेसाठी इंटरमिजिएट परीक्षेचे प्रमाणपत्र आवश्यक असते.

महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यामधून पुष्कळ विद्यार्थी शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या चित्रकला एलिमेंटरी, इंटरमिजिएट यांसारख्या ग्रेड परीक्षांना बसतात. चित्रकलेचे महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी इंटरमिजिएट ही परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, त्यामुळे या परीक्षेला अत्यंत महत्त्व आहे.

या परीक्षा सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात घेण्यात येतात. साधारण वयाच्या बाराव्या वर्षापासून पुढे या परीक्षेस विद्यार्थी बसू शकतात. या परीक्षा शालेय विद्यार्थ्यांसाठीच आहेत असे नाही, तर बाहेरील विद्यार्थी व प्रौढही या परीक्षेचा लाभ घेऊ शकतात. चित्रकला ग्रेड परीक्षेसाठी स्मरणचित्र, वस्तूचित्र, निसर्गचित्र, संकल्पचित्र, मुक्तहस्तचित्र व भूमिती असे एकूण सहा विषय होते, पण आता या अभ्यासक्रमात थोडा बदल करण्यात आला असून वस्तूचित्र, संकल्पचित्र, स्मरणचित्र, भूमिती व अक्षरलेखन या चार विषयांची परीक्षा द्यावी लागते.

### स्थिरचित्र (Still Life) :

समोर ठेवलेल्या वस्तुसमूहांचे सौंदर्यपूर्ण रेखाटन करावे लागते. प्रथम भांड्याचे रेखाटन करताना त्याचा बाह्य आकार लक्षात घेऊन वस्तूच्या वरील भागातील गोलाकाराचा सतत सराव करावा. तुमच्यासमोर ठेवलेल्या चार ते पाच मानवनिर्मित वस्तूंची मांडणी केलेली असेल. उदा., टोपली, बादली, वॉटर बाऊल तसेच निसर्गनिर्मित फळे, टोमॅटो, नारळ, पपई इत्यादींची मांडणी केलेली असते. या सर्व वस्तुसमूहांचे निरीक्षण करून स्थिरचित्राचे रेखाटन करावे लागते. या वस्तूंचे रेखाटन करत असताना वस्तूंचा आकार व कागदाचा आकार याचा अंदाज घेऊन, त्यानंतर प्रत्येक वस्तूची जागा पक्की करून घ्यावी लागते. प्रथम हलक्या हाताने वस्तूच्या जागा चौकोनातून पक्क्या करून त्याचे मूलभूत आकार रेखाटून घ्यावेत. स्थिरचित्रात आकार, रेषा, रंगच्छटा पोत, छायाप्रकाश यांचा मनोवेधक आविष्कार घडला आहे का, ते पाहिले जाते. वस्तुचित्रात यांत्रिक साधनांचा वापर करू नये तसेच पेन्सिलीने मापे घेऊन वस्तूच्या व वस्तुसंचाच्या, उंचीचा व रुंदीचा तुम्ही अंदाज घेऊ शकता. हे वस्तुचित्र सुंदर दिसावे, म्हणून समोर ठेवलेली वस्तू ज्या रंगाची आहे, त्याच रंगात तुम्ही रंगवू शकता किंवा मानवनिर्मित वस्तूंच्या रंगकामात तुम्ही बदल करू शकता, मात्र निसर्गनिर्मित वस्तूचे रंग जसेच्या तसे ठेवावे. वस्तुचित्रांचे रंगकाम करताना प्रथम एका वस्तूचे रंगकाम करावे. स्थिरचित्र रंगवताना वस्तूवर एका बाजूने प्रकाश पडतो, त्यामुळे वस्तूंची साधारण एक बाजू गडद व दुसरी बाजू



फिकट असते; म्हणजे प्रत्येक वस्तूमध्ये लाईट, मिडल व डार्क अशा तीन रंगांच्या छटा येणे आवश्यक आहे. प्रत्येक वस्तुचित्रामध्ये एकाच बाजूने प्रकाश येईल हा उद्देश ठेवून रंगकाम करावे; कारण स्थिरचित्राचे रंगकाम करताना छायाप्रकाश खूप महत्त्वाचा आहे, कारण या

छायाप्रकाशामुळे वस्तू गोल आहे, चौकोनी आहे. की चपटी आहे हे पटकन समजते. हे स्थिरचित्र तुम्ही तुमच्या आवडत्या रंगात रंगवू शकता. पोस्टर कलर, वॉटर कलर, ऑइल पेस्टल किंवा पेन्सिल कलर यांपैकी कोणत्याही एका रंगात किंवा मिक्स रंगाच्या साहाय्याने तुम्ही करू शकता. स्थिरचित्रामध्ये रंगकाम करताना मुख्य वस्तूंचे रंगकाम प्रथम पूर्ण करा. त्यानंतर मागचे व खालील कापड ड्रेपरी रंगवण्यास सुरुवात करा. प्रथम मुख्य वस्तू, नंतर इतर वस्तू, त्यानंतर कापड व सर्वांत शेवटी वस्तूंच्या सावल्या या क्रमाने रंगकाम करा. समोर ठेवलेल्या वस्तू व त्यामागील कापड हे दोन्ही एकाच रंगाचे असतील, तर कपड्यांचा रंग तुम्ही वेगळा करू शकता. स्थिरचित्रामध्ये पोतनिर्मिती म्हणजे विविध टेक्सचर्सद्वारा तुमची क्रिएटिव्हिटी दाखवू शकता. वस्तुचित्रासाठी एलिमेंटरीला अडीच तास व इंटरमिजिएटला तीन तास वेळ दिलेला असतो, म्हणून रेखाटन व रंगकाम करताना वेळेचे भान ठेवून काम करावे.

**स्मरणचित्र (Memory Drawing) :**

एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेमधल्या या विषयामध्ये वेळेला फार महत्त्व असते. स्मरणचित्र म्हणजेच स्मरणाने काढलेले चित्र, आठवून काढलेले चित्र म्हणजे एखादा झालेला प्रसंग आपल्या डोळ्यांसमोर ठेवून, तो आठवून, त्याचे सौंदर्यपूर्ण रेखाटन व रंगकाम करणे याला 'स्मरणचित्र' असे म्हणतात. सर्वप्रथम विषयानुसार कागद आडवा किंवा उभा हे निश्चित करावे. सर्वसाधारणपणे स्मरणचित्रात चार ते पाच व्यक्ती किंवा काही ठिकाणी प्राणी किंवा पक्षीही दाखवू शकता. स्मरणचित्रामध्ये मानवाकृती एका सरळ रेषेत न काढता खाली, वर अशा काढतात, तसेच प्रत्येकाच्या हालचाली, हावभाव, भिन्न दाखवल्या जातात. चित्रामध्ये जिवंतपणा व एकसंधपणा येऊन नजर खिळून राहते. चित्रामध्ये स्थिरता वाटता कामा नये. स्मरणचित्र रेखाटण्यासाठी चित्राच्या पूर्वतयारीसाठी निरीक्षण व भरपूर रेखाटने, स्केचेस करणे आवश्यक आहे. व्यक्तिरेखाटन करताना त्यांच्या हालचालींमध्ये चालणारा माणूस, धावणारा माणूस, त्याच्या अंगावरचा पोशाख, बसलेला किंवा पळणारा कुत्रा, चित्रातील निसर्ग झाडांचे रेखाटन व घर, बंगला अशा विविध गोष्टी दाखवणे आवश्यक आहे. विद्यार्थी बऱ्याच वेळा आखीव-रेखीव चित्र काढतात. तसे केल्यास चांगली गोष्ट आहे, पण त्याचबरोबर त्या विषयाच्या संदर्भात आपले स्वतःचे निरीक्षण, कल्पकता, मांडणीत वेगळेपणा असणे हेही फार महत्त्वाचे आहे.

स्मरणचित्राचे रंगकाम अनेक प्रकारे करता येते.



यातील काही प्रकारचे रंगकाम कमी वेळेत होऊ शकते, तर काही प्रकारच्या रंगकामाला थोडा अधिक वेळ लागतो. या चित्रांमध्ये रंगांचे बंधन नाही. तुम्ही कोणत्याही रंगात रंगवू शकता. पोस्टर कलर, वॉटर कलर, ऑइल पेस्टल किंवा पेन्सिल कलर किंवा मिक्स माध्यमातून हे चित्र तुम्ही पूर्ण करू शकता. या चित्राचे काम लवकर व्हावे म्हणून बाहेरील भाग म्हणजे बॅक्ग्राउंड पोस्टर कलर किंवा वॉटर कलरने करू शकता. नंतर व्यक्तिरेखाटन ऑइल पेस्टलने करून चित्र पूर्ण करू शकता. चित्रातील व्यक्तींच्या सावल्या गडद छटांमध्ये दाखवाव्यात. स्मरणचित्र उठावदार

होण्यासाठी स्केच पेनने व्यक्तिरेखाटन व बाह्यभाग आऊटलाईन करू शकता; जेणेकरून चित्राला स्पष्टता येईल. या विषयासाठी दोन तासांचा वेळ दिलेला असतो, त्या वेळेनुसार रेखाटन व रंगकाम पूर्ण करावे.

**संकल्पचित्र (Design) :**

ग्रेड परीक्षेतील संकल्प नक्षी म्हणजे विविध आकारांचे घटकांचे संकलन करून एक नवीन आकृतिबंध तयार करण्याची प्रक्रिया म्हणजे संकल्पचित्र होय. अप्रत्यक्षपणे हे एक नक्षीकाम आहे; पण हा विषय आपल्या भावनांशी निगडित आहे. निसर्गाचे स्वरूप व त्याचे टिपलेले सौंदर्य आणि आपल्या स्वतःच्या कल्पनेने त्याचा आविष्कार घडवायचा. कलावंत त्यात सतत नावीन्य आणण्याचा प्रयत्न करतो. नवनवीन आकार, नवे रंग, नवीन रंगसंगती, नवीन तंत्र त्याचबरोबर काही घटकांचे संकलनसुद्धा केले जाते. त्यातून एक आकृतिबंध तयार होतो. असे विविध प्रयोग करून नवनिर्मिती केली जाते. या सर्वांतून आकाराला येते ते संकल्पचित्र. संकल्पचित्र रेखाटताना



एखादा चौकोन, त्रिकोण, आयत, वर्तुळ, अर्धवर्तुळ असे आकार देऊन त्यात भौमितिक आकार, अक्षरे, पक्षी, प्राणी, फुले व आलंकारिक आकाराची मांडणी करून संकल्प चित्र निर्मिती करण्यास सांगितले जाते. संकल्पचित्र हे समअंगी सिमेट्रीकल किंवा विषमअंगी या दोन्ही प्रकारांनी तयार करता येते. यामध्ये एखाद्या घटकाचे विभाजन करणे म्हणजे तुकडे करणे आवश्यक असते. यासाठी विविध आकारांचा वापर आपल्याला करता येतो. संकल्पचित्र रेखाटन करण्यासाठी भौमितिक आलंकारिक आणि नैसर्गिक, आकारांचा वापर केला जातो. या चित्रांमध्ये तोल, घटकांचे प्रमाण, घटकांचा क्रम, उत्सर्जन, लय ही संकल्पचित्राची काही मूलतत्त्वे असून योग्य प्रकारे आविष्कार घडणे आवश्यक असते. या प्रकारामध्ये ठरावीक त्रिज्येचे वर्तुळ काढून, इतर आकार अर्धवर्तुळ, आयत, चौकोन, षटकोन असे घेऊ शकतो. या आकारांमध्ये विविध भौमितिक आकार रेखाटले जातात. हे भौमितिक आकार एकमेकाला छेदतात, त्यामुळे मूळ आकार विभागला जाऊन त्यातून नवीन आकार तयार होतो. भौमितिक आकारांमध्ये आपण वर्तुळ, चौरस चौकोन, आयत, षटकोन, पंचकोन, विविध रेषा व आलंकारिक आकाराचे विविध रेषा रेखाटन करू शकतो. त्यातून एक सुंदर नक्षी तयार होते. संकल्प चित्र हा रचनाचित्राचा मूळ पाया आहे. संकल्पचित्र नेहमी दिलेल्या कागदाच्या मधोमध काढावे. विशिष्ट आकार काढा असे सांगितले नसेल, तर प्रथम बाह्य आकाराचा विचार करावा नंतर आतल्या आकारांची रचना करावी. तसेच निसर्ग चित्रांचा अभ्यास करताना तुम्ही विविध पानाफुलांचे बारकावे लक्षात घेऊन, त्याच क्षेत्रात आलंकारिक आकारांचा वापर संकल्प चित्रांमध्ये करू शकता. संकल्प चित्रात सरळरेषा, वक्ररेषा व आलंकारिक रेषा नेहमी शेवटी काढाव्यात, कारण त्या चित्रातील इतर आकार काढल्यावर चित्रात जेथे मोकळी जागा सुटली आहे असे वाटत असेल, त्या ठिकाणी या रेषा काढून चित्रातील तोल सांभाळता येतो. हे चित्र रंगवताना योग्य त्या रंगसंगतीचा विचार करावा. उदा., उष्ण रंगसंगती, संबंधित रंगसंगती, शीत रंगसंगती. आपल्याला आवडेल अशी रंगसंगती निवडून चित्राचे रंगकाम कौशल्यपूर्ण करावे. चित्रात रंगकाम झाल्यानंतर विविध तंत्रांनी व

मुद्रा चित्रांनी पोतनिर्मितीदेखील करता येते. छायाछटा, आकार, रंगसंगती, लयदार रेषा असे संकल्पचित्र शोभून दिसते.

तसे पोत (टेक्सचर) निर्मिती यामुळे संकल्पचित्राची रचना अधिक खुलून दिसते. हे सर्व तंत्र वापरून तुम्ही संकल्पचित्र सौंदर्यपूर्ण करू शकता. या चित्रासाठी परीक्षेत एलिमेंटरीला अडीच तास व इंटरमिजिएटला तीन तास वेळ दिला असतो. या वेळेत चित्राचे रेखाटन व रंगकाम पूर्ण करावे.

**भूमितीचे महत्त्व :**

समतोल भूमिती हा विषय एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट या दोन्ही ग्रेड परीक्षांसाठी महत्त्वाचा भाग आहे. या विषयाचे मूलभूत ज्ञान कला विद्यार्थ्याला भौमितिकदृष्ट्या लहान भागांमध्ये विभागून विविध रचना आणि कलात्मक आकार काढण्यासाठी मदत करते. हा एक सोपा विषय आहे, जो तुमची ग्रेड वाढवण्यास मदत करेल. विद्यार्थ्यांनी या विषयाकडे दुर्लक्ष करू नये. रेषा व रेषेचे भाग, कोन, कोनाचे प्रकार व कोनाचे भाग, कंस व कंसाचे प्रकार, त्रिकोण व त्रिकोणाचे प्रकार, चौरस व चौरसाचे प्रकार, आयत व आयताचे प्रकार, वर्तुळ, वर्तुळाचे प्रकार व वर्तुळाचे भाग करणे इत्यादी प्रकार, तुमच्या पुस्तकात सोडवून दाखविल्याप्रमाणे सोडवण्यास तुम्ही सक्षम असाल आणि ती उदाहरणे सोडवण्याचा तुम्ही नियमित सराव केला असेल, तर भूमितीतील ती सर्व उदाहरणे तुमच्याद्वारे अचूकपणे सोडवली जातील. भूमितीतील आकृत्या काढताना पेन्सिल किंवा लीड पेन्सिल वापरावी. आकृत्यांमध्ये नको असलेल्या रेषा पुसट ठेवाव्यात. त्यातील जे उत्तर असेल त्या आकृतीला डार्क करावे; जेणेकरून विषय कोणता आहे ते पटकन कळेल. जे विद्यार्थी एलिमेंटरीची परीक्षा न देता डायरेक्ट इंटरमिजिएट परीक्षा देत असतील, त्या विद्यार्थ्यांनी एलिमेंटरीच्या सर्व भूमितीचा अभ्यास करून नंतर इंटरमिजिएट भूमितीचा सराव करावा. भूमितीमध्ये प्राथमिक घन भूमिती व प्रमाणपट्टी आरेखन यांचा योग्य तो अभ्यास व सराव करावा. तसेच आकृत्या काढताना रिपिट रेषा किंवा खाडाखोड करू नये याची दक्षता बाळगावी. परीक्षेत या व्यतिरिक्त पट्टी (स्केल), देवनागरी व रोमन लिपीत अक्षरलेखन असते. इंटरमिजिएटसाठी परीक्षेच्या वेळी प्रश्नपत्रिकेत शेवटचा प्रश्न दिलेल्या एका आकारामध्ये तुम्हांला ते




नाव बसवून पूर्ण करायचे असते. तुम्हांला एक अक्षर दिलेले असते. त्या अक्षराला, विषयाला अनुसरून त्या आकाराला शोभेल असे एक चित्र, म्हणजे लोगो तयार करून सुंदर रंगसंगतीत सौंदर्यपूर्ण रंगवून अक्षरलेखन पूर्ण करावे. या भूमिती विषयासाठी एलिमेंटरी परीक्षेसाठी दोन तास व इंटरमिजिएट परीक्षेसाठी तीन तासांचा वेळ दिलेला असतो. या वेळेत आपल्या भूमितीच्या आकृत्या पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी.

**वरील सर्व विषयासांठी घ्यावयाची काळजी :**

(१) प्रत्येक चित्राचे सुरुवातीला कच्चे रेखाटन करावे. त्यामुळे तुम्हांला त्याची प्रमाणबद्धता कळेल.


(२) चित्राचे रेखाटन करताना जास्त खाडाखोड करू नये; जेणेकरून केलेले रंगकाम फ्रेश दिसेल.

**(पृष्ठ क्र. २७ वर)**

# बलशाली राष्ट्रनिर्मितीसाठी महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक विचार

**वृषाली कडलग**
जि. प. प्रा. शाळा देशमुख मळा,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर.
भ्रमणध्वनी : ९८२२५८८८९८

*२ ऑक्टोबरला महात्मा गांधीजींची जयंती असते. या दिवशी सर्व शाळांमधून महात्मा गांधीजींच्या जीवनचरित्राचे, विचारांचे स्मरण केले जाते. महात्मा गांधीजींचे ग्राम–विकासापासून सर्वच क्षेत्रांतील विचार आजही उपयुक्त आहेत. त्यांनी कृतियुक्त जीवन शिक्षणाला महत्त्व दिले. म. गांधीजींच्या या शिक्षण विचारांना स्पर्श करणारा हा लेख.*



महात्मा गांधी हे या देशाचे वैभव आहेत. गांधीजींच्या विचारांचा स्वीकार बुद्धीच्या पातळीवर, अनुभवाच्या पातळीवर आणि विचारांच्या पातळीवर होणे ही काळाची गरज आहे. महात्मा गांधी म्हणतात, रामराज्य असावे. रामराज्याची संकल्पना मांडताना महात्मा गांधी असे म्हणाले आहेत, ''ही पृथ्वी परमेश्वराची आहे, हे येथे राहणारे सर्व मानव एक आहेत. प्रत्येक गाव स्वयंपूर्ण आणि समानतेने सुखी व्हावे हे माझ्या स्वप्नातील रामराज्य आहे.''

शोषण–विरहित समाजाची स्थापना करण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल, असा महात्मा गांधीजींना विश्वास होता. त्यासाठी सर्वांनी शिक्षित झाले पाहिजे असे त्यांचे मत होते. शिक्षणाशिवाय स्वस्थ समाजनिर्मिती अशक्य आहे, यावर ते ठाम होते.

त्यासाठी महात्मा गांधीजींनी शिक्षणाचे उद्देश आणि सिद्धांत यांची व्याख्या सांगितली. एवढेच नव्हे, तर प्रारंभिक शिक्षणाची योजना कशी असावी, याचे विचारही मांडले. त्यांचे शिक्षणाबद्दलचे विचार हे महात्मा गांधी हे एक शिक्षणतज्ज्ञ होते, हे लक्षात आणून देतात. महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक योगदान अद्वितीय आहे. त्यामुळेच त्यांचे व्यक्तित्व व कर्तृत्व हे आदर्शवादी राहिले आहे. त्यांचे आचरण हे प्रयोजनवादी विचारधारेने ओतप्रोत होते. जगातील लोक महात्मा गांधीजींना एक महान राजनीतीज्ञ व समाजसुधारक मानतात. त्यांचे असे म्हणणे होते, की सामाजिक उन्नत्तीसाठी शिक्षण हे दीपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक ठरेल.

अहिंसक, न्यायपूर्ण, समता व सहकार्याधारित समाज–संस्कृतीची निर्मिती व्हावी यासाठी महात्मा गांधी यांनी सेवाग्राम येथे 'नई तालीम' या अभिनव शिक्षणपद्धतीची सुरुवात केली. 'नई तालीम' हे सर्वोदयी व अहिंसक समाजनिर्मितीसाठीचे साधन आहे, अशी महात्मा गांधी यांची धारणा होती. महात्मा गांधीजींनी ती पद्धत प्रथम दक्षिण आफ्रिकेत असताना तेथील आश्रमातील मुलांच्या शिक्षणासाठी वापरली.

१९३७ साली महात्मा गांधीजींनी वर्धा येथील शिक्षण संमेलनात बुनियादी शिक्षणाची सविस्तर मांडणी केली. त्यावेळी रवींद्रनाथ टागोर यांच्यासोबत काम केलेले आर्यनायकम पती–पत्नी यांनी शाळेची जबाबदारी घेतली. त्यानुसार वर्धा आणि आंध्र

प्रदेश, तामिळनाडू, काश्मीर, बिहार, ओरिसा या राज्यांत शाळा सुरू करण्यात आल्या. १९५६ साली महात्मा गांधीजींच्या आचारविचारांतून सुरू झालेल्या ’नई तालीम’ पद्धतीच्या देशभरात अठ्ठेचाळीस हजार शाळा होत्या. या शाळांमधून ५० लाख मुले शिकत होती. महात्मा गांधी यांच्या शिक्षण विचारांचा प्रसार इतक्या मोठ्या प्रमाणावर झाला होता.

महात्मा गांधी यांच्या मते, नवीन प्रशिक्षणाची कल्पना हे त्यांचे भारतातील सर्वोत्कृष्ट योगदान आहे.

सत्याच्या शोधासाठी दीर्घ काळपर्यंत संशोधन आणि देश सामर्थ्यसंपन्न करण्यासाठी सक्रिय प्रयोगांद्वारे विचारमंथन होणे आवश्यक आहे.

महात्मा गांधीजींच्या मते नवीन शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे शिक्षण आहे. शिक्षणाचे समानतेवर आधारित उद्दिष्ट, शोषणमुक्त समाज निर्माण करून समाजातील मागास घटकांचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकास करणे हे होय. या शिक्षणपद्धतीत व्यक्तीमध्ये नेतृत्वगुणक्षमता आणि दृढनिश्चय शक्तीचा विकास होणे अपेक्षित आहे. जबाबदार नागरिक निर्माण करण्यासाठी ही शिक्षणपद्धती आवश्यक होती.

महात्मा गांधी यांनी 3H हा विचार मांडला. Head, Hand आणि Heart यांचे शिक्षण मुलांना दिले, तरच मुले स्वावलंबी होतील. महात्मा गांधीजींच्या शिक्षणव्यवस्थेत मेंदूबरोबर हाताला काम देण्याची महत्त्वपूर्ण संकल्पना होती. प्रत्येकाच्या जीवनात स्वावलंबन गरजेचे आहे. आपल्या जीवनात मूलभूत शिक्षण अत्यंत आवश्यक आणि मूल्यवान आहे. महात्मा गांधीजींची वर्धा योजना ही ‘नई तालीम, बेसिक एज्युकेशन’ या नावानेही ओळखली जाते.

शिक्षणातून हाताला काम मिळणे, याचा अर्थ शिक्षणात व्यावसायिक स्वरूपाचा अंतर्भाव असणे आवश्यक आहे. मात्र त्यांच्या या संकल्पनेला चुकीचे समजून अनेकांनी त्यावर टीका केली होती. वर्तमान मात्र पुन्हा गांधीजींचा विचार डोळ्यांसमोर ठेवून भूमिका घेऊ लागले आहेत. गेली काही वर्षे कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार कार्यानुभव नावाचा विषय आपण अंतर्भूत केला. कार्यानुभवातून कौशल्य आत्मसात होणे आवश्यक होते. याचा विचार परिणामकारक व प्रभावीपणे झाला नाही. त्यामुळे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये इयत्ता ६ वी पासूनच व्यवसाय शिक्षणाचा विचार केला गेला आहे. याचा अर्थ गांधीजींनी सुचविलेल्या शिक्षणव्यवस्थेत किती महत्त्वाचा विचार समाविष्ट होता हे आपल्या लक्षात येईल. आपल्या परिसरात उपलब्ध असलेल्या व गरज असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध होऊन गावे समृद्ध व्हावीत, स्वयंपूर्ण व्हावीत यासाठी शिक्षण व्यावसायिक दृष्टीने पुढे जायला हवे, हा विचार गांधीजींच्या हाताला काम या संकल्पनेत अधोरेखित होताना पाहायला मिळतो.

‘हृदयाला भाव मिळणे’ याचा अर्थ शिक्षण अधिक भावनिक विकासाच्या प्रक्रियेतून उंचावणे असा आहे. शिक्षण हे माणसाला माणसासोबत आणि निसर्गासोबत जोडत असते. शिक्षणातून माणूस पैशाचा लोभ धरू लागला, की नात्याचे संबंध त्याला महत्त्वाचे वाटत नाहीत. पैसा हे सर्वस्व होऊन जाते आणि हृदय कोरडे पडू लागते. त्यामुळे शिक्षणातून भावनिक विकासाची नितांत गरज असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले होते. हृदय संवेदनशील व्हायला हवे. त्यातून समाज व राष्ट्र संघटनेची शक्ती निर्माण होईल व समाजातील दरी

कमी होईल हा त्यांचा दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा आहे. अहिंसेच्या तत्त्वज्ञानासाठी शिक्षणातून भावनिक विकासाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले होते.

शिक्षणातून बौद्धिक क्षमता विकसित झाली पाहिजे. विचार संतुलित असले पाहिजेत आणि माणूस संवेदनशील झाला पाहिजे; असे झाले तरच स्वस्थ समाजनिर्मिती होईल असे गांधीजींचे मत होते. मुलाच्या बौद्धिक आणि मानसिक क्षमतांचा पूर्ण विकास झाला, की तो जबाबदार माणूस होईल, एवढेच नव्हे; तर अनेक बुद्धिवादी क्षेत्रांत तो योगदान देऊन राष्ट्र सामर्थ्यसंपन्न करील असे त्यांना अपेक्षित होते.

महात्मा गांधीजींनी अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र यांची सांगड घालण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. आज मात्र अप्रामाणिकपणा इतका वाढला आहे, की प्रामाणिकपणावर लोकांचा विश्वासच बसत नाही. हे सर्व महात्मा गांधीजींची शिक्षणव्यवस्था न स्वीकारण्याचे परिणाम आहेत. खरे अर्थशास्त्र सामाजिक न्यायाचा पाठपुरावा करते. हाताला काम नाही, पोटाला अन्न नाही, तुम्ही आम्ही सुखात राहू, बाकीचे मेले तर मरू देऊ, अशी प्रवृत्ती तिसऱ्या जगात दिसते आहे. हे महात्मा गांधीजींच्या शिक्षणव्यवस्थेला हे मान्य नव्हते.

खऱ्या अर्थाने भारताला जर सामर्थ्यसंपन्न व बलशाली करायचे असेल, तर महात्मा गांधीजींच्या या शिक्षणविषयक योगदानाची व विचारांची आजही दखल घेणे आवश्यक ठरेल, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

■■■

**(पृष्ठ क्र. २५ वरून)**

(३) प्रत्येक चित्राचे आपल्या आवडत्या रंगसंगतीने रंगकाम करावे.

(४) चित्राची बाह्यरेषा जास्त बारीक नसावी व फार जाडही नसावी.

(५) आपल्याला दिलेल्या कागदाला शोभेल असे चित्राचे रेखाटन व त्याची मांडणी करावी.

(६) खडूचे रंगकाम करायचे असेल, तर अगोदर ब्लॅक कलर ब्रश किंवा ब्लॅक स्केच पेनने आऊटलाईन करावी.

(७) वॉटर कलर किंवा पोस्टर कलर वापरावयाचे असतील, तर रंगकाम झाल्यानंतर बाह्यरेषा/आऊटलाईन दाखवावी.

(८) स्मरणचित्राचे रेखाटन करताना भौमितिक आकारांचा वापर करू नये.

(९) प्रत्येक चित्रामध्ये ग्रुप असणे आवश्यक आहे. सर्व भागांचे एका ओळीत रेखाटन करू नये.

(१०) वस्तू चित्रांमध्ये प्रत्येक वस्तूवर थ्री डायमेन्शन म्हणजे लाईट, मिडल व डार्क अशा तीन शेड्स असणे आवश्यक आहे.

(११) परीक्षेच्यावेळी चित्राचे काम करताना आपल्याला दिलेल्या वेळेनुसार चित्राचे काम पूर्ण करावे.

सर्व कलाप्रेमी विद्यार्थ्यांना माझ्या खूप खूप शुभेच्छा!

■■■

# चित्रकार्ड व शब्दांचे झाड मुलांच्या वाचनासाठी उपयुक्त ठरले ...

**विनोद राठोड**
जि. प. प्राथ. शाळा सालनापूर पं.स.,
धामणगाव रेल्वे, जि. अमरावती.
भ्रमणध्वनी : ९०७५१३४३२०

*पहिलीतील मुलांना वाचन, लेखन चांगल्या प्रकारे यावे. वाचन, लेखनकौशल्यात मागे राहिलेल्या मुलांना ती कौशल्ये अवगत करण्यासाठी चित्र, शब्द यांच्या माध्यमातून केलेला प्रयत्न, स्व-अनुभव यांवर आधारित हा लेख.*

**हेतू : इयत्ता पहिलीत असणाऱ्या व वाचनात मागे पडलेल्या मुलांना ३० दिवसांत वाचन करता येणे.**

मुलांना वाचता येत नाही या समस्येचा वारंवार उल्लेख होत असतो; परंतु इयत्ता पहिलीतील मुले शब्दांचे सहज वाचन करतात याचा प्रत्यय महाराष्ट्रातील सर्वच शिक्षकांना कुमठे व ताडाळी बीटच्या अभ्यासदौऱ्यात आला असेल.

शाळेच्या प्राचार्यांनी आम्हांला शब्दकार्डांच्या उपयोगाबाबत मार्गदर्शन केले. आमच्याकडे भाषिक समस्या असल्याने चित्राकडून शब्दाकडे जाणे आमच्यासाठी सोयीस्कर ठरले असते. सर्व शिक्षकांनी मिळून परिसरातील मुलांना परिचित असणारी १०० चित्रे गोळा केली आणि एका पट्टीवर ती चिकटवली आणि त्यामागे त्या चित्राचे नाव लिहिले. एका चित्रपट्टीवर नाव आणि दुसऱ्या पट्टीवरही नाव लिहिले.

हाच प्रयोग दुसऱ्या पद्धतीने मांडण्याचे आम्ही ठरवले. त्यासाठी शैक्षणिक साहित्य निर्मिती करण्याचे ठरले. आम्ही सलाईनच्या टाकाऊ बाटल्यांपासून शब्दांचे आणि चित्रांचे झाड बनविले. एक प्रकारची ती शब्दांची बागच होती. हे झाड शाळेच्या दरवाजाजवळ ठेवताच मुले त्या झाडाकडे आकर्षित होऊ लागली, त्यावरील चित्रे पाहू लागली. आता आम्हांला झाडाशी, सरळ चित्रपट्ट्यांशी सहसंबंध जोडायचे होते. अवघ्या चार-पाच दिवसांतच आम्हांला यश मिळायला लागले. एका महिन्यात मुले १०० शब्द वाचू आणि लिहू लागली.

**प्रयोग १ –** मुलांना आपल्या जवळ बसवून त्यांना एक-एक कार्ड उचलायला लावायचे व त्याचे नाव मुलांना सांगायला लावायचे. दहाच्या गटामधील चार मुले तरी त्याचे नाव सांगतील. चित्र – नाव – नाव – चित्र असा सराव घ्यायचा. जसे – गाय शब्द – गायीचे चित्र मुले गाय म्हणतात, आम्ही त्याला नाव दाखवायचे. अवघ्या पाच-सहा मिनिटांत एक शब्द लक्षात आला. आता फक्त नाव दाखवले, तरी मुले ते वाचतील – गाय; कारण मुलांनी त्या आकृतीचे वाचन केले होते. त्याचप्रमाणे मुळाक्षरांना अनुसरून चित्रपट्ट्या व चित्रांचा सराव घेतला. चमत्कार असा झाला, की मुले अवघ्या काही दिवसांतच मुळाक्षरांसोबत शब्दांचे वाचन करू लागली.

जसे – गाय आहे. (गा) लिहिले, मुलांना वाचायला सांगितले, तर मुलांसमोरील गाय मधील पहिल्या चित्राची आकृती 'गा' आणि दुसरी आकृती 'य' असल्याने ती मुले 'गा' म्हणू लागली. त्यालाच जोडून आपण गाव लिहिले, की मुले गाव वाचत होती गार, गाव, गाठ असे शब्द सहज वाचत होती. मुलांना एकदा आकृती स्मरणात राहिली की वाचताना शब्द, वाक्य सहज दिसतात.

**प्रयोग २ –** वाचन केलेला शब्द तेव्हाच वहीत लिहायला लावायचा. एकदा लिहिलेले दहा वेळा वाचल्यासारखे होते, असे मी कुठेतरी वाचले होते. आता मुलांनी

लिहिले, की ते वाचतात. लिहिण्यासोबत मुलांना वाचनाची सवय होऊ लागली.

### प्रयोग ३ – अन्त्याक्षरी पद्धतीने शब्दांचा सराव :

फळ्यावर खडूने गाय लिहिले – य – यम – मगर – रथ – थवा – वात – तलवार – रस... फळाभर लिहीपर्यंत मुले शब्द सांगायची आणि वाचायची. जर आपण चुकीचा शब्द लिहिला, तर मुले लगेच म्हणतात, 'नाही सर, ते चुकले'. शब्दखेळामुळे त्यांचा वाचनाचा आत्मविश्वास वाढला.

### प्रयोग ४ – शब्द किंवा अक्षर शोधणे व वाचून गोल करणे :

कुठेतरी एक शब्द लिहायचा व मुलांना तो शोधायला लावायचा किंवा वर्तमानपत्रांच्या कात्रणातील एक शब्द सांगायचा व तो शब्द शोधण्यासाठी संपूर्ण वर्तमानपत्रामधील शब्द मुलांच्या डोळ्यांसमोरून जातात त्यामुळे शब्द वाचनात परिपक्वता येताना दिसली.

### प्रयोग ५ – शब्दझाडाचा उपयोग :

मुलांना शब्दझाडावरील एक शब्द शोधायला लावायचा किंवा चित्र शोधायला लावायचे, परंतु प्रत्यक्षात त्या झाडावर ते शब्दच नसतील. मुले एकाग्रतेने ते शब्द शोधताना प्रत्येक शब्द बघतात, डोळ्यांसमोर आणतात, वाचतात. आता एकाने चतुराईने सांगितलेले शब्द जोडायचे. ज्या मुलांनी ते शब्द शोधले, त्यांचे टाळ्यांनी कौतुक करायचे किंवा पाहिलेल्या सर्वच शब्दांचे लेखन करायला लावायचे. प्रथम चित्रांचा सराव आणि नंतर शब्दांचा सराव घेतल्याने मुले सहज एकमेकांना वाचण्यासाठी मदत करताना दिसतात.

### प्रयोग ६ – स्वरचिन्हांचा उपयोग :

स्वरचिन्ह असलेल्या शब्दांचा सराव दिला. मुले 'आ ' पासून 'अं' पर्यंतची स्वरचिन्हे सहज ओळखू लागली.

### प्रयोग ७ – पाच अक्षरे, एक किंवा दोन स्वरचिन्हांपासून शब्द बनविणे :

शब्दांचा हा खेळ मुलांसाठी वरदान ठरला. मुले वीस ते पंचवीस शब्द सहज तयार करू लागली व वाचू लागली.

### प्रयोग ८ – शेवटी येणाऱ्या अक्षरापासून चारोळ्या तयार करणे :

जसे : 'ळा' शेवटी येणारे अक्षर

शब्द : बाळा, फळा, मळा, काळा, शाळा

चारोळी : चल रे बाळा, शिकू आपण शाळा,
शाळेत आहे फळा, रंग त्याचा काळा,
बाजूलाच आहे मळा.

### उपक्रमाचे फायदे :

- अक्षर ओळखण्यापासून ते शब्दापर्यंत सहज वाचन करता येते.
- अतिशय कमी खर्चात उपक्रमाची अंमलबजावणी करता येते.
- वेळेची बचत होते.
- गटाने काम करण्याचे फायदे मुलांच्या लक्षात येतात.
- मुलांमध्ये मदतीची भावना निर्माण होते.
- हा उपक्रम मनोरंजनात्मक असल्यामुळे मुले त्याकडे सहज आकर्षित होतात व कंटाळा करत नाहीत.

या प्रकारचे वाचन करताना मुलांना मजा येते आणि मुले हसत-खेळत वाचन करू लागतात.

### परिणाम :

एकोणतीस दिवसांतच मुले वाचन करू लागली. मुलांमध्ये प्रचंड आत्मविश्वास निर्माण झाला. त्यामुळे वाचनासोबत ती व्यक्त व्हायला लागली.

■■■

# माझी उपक्रमशील शाळा

**पूनम खोराटे**
जि. प. पूर्ण प्राथमिक शाळा बोडदे,
ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग

*"पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यांबाबत 'निपुण भारत अभियानअंतर्गत सर्वत्र प्रयत्न सुरू आहेत. व्यक्तिगत पातळीवर शिक्षकही आपल्या कल्पकतेने काही उपक्रमांतून ते साध्य करण्याचा प्रयत्न करत आहेत. वाचन, लेखन, संख्याज्ञान, संख्यांवरील क्रिया यांसाठी प्रयत्न करत आहेत. त्यांपैकीच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दुर्गम भागातील एका शाळेतील उपक्रमाची माहिती देणारा लेख."*

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार, प्राथमिक गटातील इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांनी भाषा व गणित विषयक पायाभूत कौशल्ये आत्मसात करावीत, यासाठी 'निपुण भारत अभियान' संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे, त्या अनुषंगाने मी राबविलेले काही उपक्रम.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP) नुसार संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या हेतूने शिक्षण क्षेत्रात संशोधन करून विविध बदल घडवून आणण्यात आले. त्यासाठी 'निपुण भारत अभियान २०२१' ची देशपातळीवर अंमलबजावणी चालू आहे. त्यातीलच महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे 'पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान' यासाठी सर्वांनी ऑनलाईन/ऑफलाईन प्रशिक्षण घेऊन कार्यक्रमाचा हेतू कोणता? व कार्यवाही कशाप्रकारे करावी? हे जाणून घेतले. देशातील सर्व प्राथमिक गटातील इयत्ता पहिली ते तिसरीचे विद्यार्थी प्रगत करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कृतिउपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यातीलच एक भाग म्हणजे 'शाळापूर्व तयारी' अभियान होय. इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा बौद्धिक, भावनिक, शारीरिक विकास, भाषा व गणनपूर्व तयारी होणे आवश्यक होते. त्यासाठी माझ्या शाळेत एप्रिल महिन्यातच शाळापूर्व तयारीचा पहिला मेळावा संपन्न झाला. शाळेच्या मुख्याध्यापकांनी गावातील प्रतिष्ठित मंडळी, सरपंच, शिक्षणप्रेमी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व पालक सदस्य इत्यादींना कार्यक्रमाविषयी निमंत्रणे पाठवली. पहिल्या मेळाव्याची भव्य तयारी झाली. शाळेला शैक्षणिक सोहळ्याचे स्वरूप आले होते. वाजत-गाजत इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या मुलांचे स्वागत करण्यात आले व या सर्व मुलांचे औक्षण करून मुलांचे तोंड गोड करण्यात आले. त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक, बौद्धिक, शारीरिक क्षमता तपासून, मुलांना कोठे मदतीची गरज आहे? कोणती कृती मुले चांगल्या प्रकारे करतात? याचा आढावा घेण्यात आला. माता-पालक गट तयार करून त्यांना वेळोवेळी आयडिया, व्हिडिओ पाठवून, तसेच प्रत्यक्ष भेटून मार्गदर्शन केले. त्यांच्या शंकांचे निरसन करून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी मातांना प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर स्मार्ट मातांचे अनुभवकथन करून, इतर मातांनाही या अभियानात सक्रिय सहभागी करून घेतले.

इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांसाठी दुसरा मेळावा घेऊन पुन्हा विकास कार्डांची पडताळणी केली. विद्यार्थ्यांना भाषा, गणित, इंग्रजी विषयाच्या श्रवण, भाषण, वाचन, लेखन, संभाषण क्षमता प्राप्त होण्यासाठी शाळा स्तरावर नियोजन करण्यात आले,

ते पुढीलप्रमाणे.

- **शब्दांचा राजा :**

या उपक्रमामध्ये इयत्ता पहिली ते तिसरीच्या मुलांना दररोज २० शब्द श्रुतलेखनासाठी दिले जातात. अचूक शब्द लिहिणाऱ्या मुलांना बक्षिसे देऊन किंवा मुकुट घालून, टाळ्या वाजवून त्यांचे अभिनंदन केले जाते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला असे वाटते आज आपण राजा बनावे, त्यासाठी मुले नियमित वाचन करतात व अचूक लेखनाचा प्रयत्न करतात.

- **चौदाखडीतील मुळाक्षरांनुसार शब्दांचे लेखन :**

या कृतीमध्ये चौदाखडीतील मुळाक्षरांनुसार शब्द लिहिण्यासाठी मुले पाठ्यपुस्तके, अवांतर पुस्तके, वर्तमानपत्रे यांचा वापर करू लागली. त्यांची शोधकवृत्ती वाढीस लागली आणि नकळत स्पर्धा परीक्षेतील वर्णानुक्रमे शब्दांची मांडणी करणे हा घटक सहज शिकून गेली.

- **संख्या ओळख वेगळ्या रीतीने :**

या कृतीत संख्यांचे वाचन फक्त १ ते १०० असे न करता संख्यांचे उलट क्रमाने वाचन, आडवे वाचन, टप्प्याने संख्या वाचन, सम-विषम संख्या वाचन, दशक व एकक कांड्या घेऊन संख्या वाचन, तसेच स्वतः पाढे तयार करून त्यांचे वाचन. उदा., इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांना १९ चा पाढा येत नसेल, तर मुले १० व ९ चा पाढा लिहून त्यांची बेरीज करून त्या पाढ्याचे वाचन करीत. त्यामुळे मुलांना स्वनिर्मितीचा आनंद घेता आला व गतीने उदाहरणे सोडविण्याचा सराव झाला. मुले संख्या वाचन गतीने करू लागल्यामुळे संख्यांतील लहान-मोठेपणा सहज ओळखू लागली. इयत्ता पहिलीची मुले जानेवारी, फेब्रुवारी पर्यंत १००० पर्यंत संख्या लिहू व वाचू लागली. इयत्ता तिसरीचे विद्यार्थी चारअंकी लहान-मोठी, सम-विषम संख्या सहज ओळखू लागले. केंद्रप्रमुखांनी शाळेला भेट देऊन मुलांचे पाढे पाठांतर पाहिले व त्यांचे कौतुक केले.

- **Word building and word mountain :**

या कृतीमध्ये मुळाक्षरांनुसार जास्तीतजास्त शब्दलेखन करणे अपेक्षित आहे. Word Mountain कृतीमध्ये एक शब्द दिल्यानंतर त्यावरून वाक्य वाढवत जाणे, अशाप्रकारे कृती घेतल्याने विद्यार्थी जास्तीतजास्त शब्द वाचन, लेखन करू लागले आणि धडाधड शब्द पाठ होऊ लागले. अध्यापन करताना Online Rhymes, Words Reading चा वापर केल्याने शब्दांचे योग्य उच्चार करण्यास मदत झाली. मुलांचे बरेच Conversation, Skill, Story telling इत्यादींचे व्हिडिओ तयार करून यू-ट्यूबवर अपलोड केल्यामुळे मुले घरी लिंकद्वारे पाहू लागली. त्यांच्या ज्ञानाचे दृढीकरण झाले. Opposite Words, Animal Young Ones Video तयार करताना मुले स्वतःचा आवाज देऊ लागली. त्यामुळे व्हिडिओ निर्मितीचा आनंदही त्यांना मिळू लागला.

कोणतीही कृती करत असताना ती समजपूर्वक, गतीने सहजतेने करता आली, तर त्यात कौशल्य प्राप्त झाले, असे आपण म्हणतो. त्याचप्रमाणे माझ्या विद्यार्थ्यांनी सर्व विषयांत कौशल्ये प्राप्त केली आहेत. गतवर्षी २०२२-२३ मध्ये इयत्ता तिसरीतील विद्यार्थ्यांनी 'गुरुकुल टॅलेंट सर्च' स्पर्धा परीक्षेत ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केले. एक विद्यार्थी तालुक्यात प्रथम आला, तसेच इयत्ता पाचवीतील कु. अथर्व पाटील हा शिष्यवृत्तिधारक बनला. हे यश मला दररोज घेण्यात येणाऱ्या उपक्रम-कृतींतूनच प्राप्त झाले आहे. शाळा स्तरावर विविध कृतिउपक्रम घेतल्यास विद्यार्थ्यांना अध्ययनाची गोडी लागतेच आणि गुणवत्तावाढ होते.

■■■

# Student self-evaluation

**Dr. Swati Khaire**
The Greater Mumbai Education Society's High School, VileParle (E), Mumbai.
Mobile No. : 9820182158

Evaluation is an important component of the educational process. The ultimate aim of the evaluation process is to improve the learners learning outcomes, but the learner is always a recipient of the process rather than an active participant, as evaluation is predominantly teacher controlled. If we move from teacher – controlled evaluation to student- led evaluation; the education process will be more inclusive, compressive, and sustainable.

Student self-evaluation is a process of formative assessment during which the students reflect on and evaluate the quality of their work and learning, judge the degree to which their learning meets the stated goals, and identify strengths and weaknesses in their work. Self-evaluation by the students involves their self-observation, self-reaction, task analysis, self-monitoring, self-motivation, and self-rating. Self-evaluation may range from a careful observation of the quality of one's own work with reference to a checklist, a rubric, or feedback from peers to scoring or grading one’s own work. What distinguishes these practises from other assessment practises is that they are carried out by the students with greater autonomy from parents and teachers.

## Self-evaluation and improved performance :

Self-evaluation is a valuable tool for learning and evaluation that makes the students reflect on their own level of achievement. It helps the students :

> *Evaluation is a continuous process. It to be understood with reference to learning. Self-evaluation is the best technique for farther improvements. evaluation can be considered as learning.*

- to identify gaps in their understanding and capabilities with respect to desired goals.
- to explore and understand the ways and means to improve their performance.
- to take increased responsibility for their own learning.
- Self-evaluation increases active involvement in the entire education process, and they get clarity about the instructional goals and work to meet them.
- Students learn how to learn and focus not only on the product of learning but also on the process of learning.
- Self-evaluation minimises disruptive behaviour in the class.

## Tools for Self-evaluation :

A variety of tools can be used for this purpose.

- Checklists, Rubrics, Exemplars, Models, and Journals can commonly be used. With the involvement of students, a checklist with

an adequate number of criteria aligned with the goals of the task can be framed for the students' reference to evaluate their task.

- Rubrics need to be created in a child friendly language, taking into account the progressively higher developmental stages students are required to achieve.
- Exemplars or models of the task assigned to the students can be created for display and reference; students may be asked to compare their own work with the exemplars.
- Students may maintain a journal to record the goals they set and write descriptive assessments and reflections on their own tasks. Digital technology can be used by the students for the evaluation process. They can reflect on their work by watching audio and video recordings of their presentations and speeches in the classroom. Blogs can be set up and shared with the students to invite feedback.

**Introduce self-evaluation to the students :**

Before we introduce self-evaluation, we need to ensure that students learn to evaluate effectively, and parents and students need to understand how self - evaluation is being used to facilitate students learning and serve the greater purpose of education.

- Teachers need to address students' views about self-evaluation and engage students in discussion and activities to make them see the benefits of self-evaluation.
- Some may question the worth of self-evaluation ; we may allow them time to accept the process.
- Teachers need to provide students with opportunities to practise different aspects of self - evaluation process, like brainstorming for arriving at the criteria of evaluation, applying these criteria to their own work, receiving timely feedback on their self-assessment, and developing goals and action plans.
- Parents and guardians need to be made aware of when and why self-evaluation tools are used in addition to all tools used for evaluation.
- Students must know that it is safe to disclose low performance, and they do need to resort to score enhancement strategies.

**Students as self-evaluators :**

- For the purpose of self - evaluation, students need to ask themselves key questions : where am I now, and where do I need to go? What do I need to do to get there?
- We can help the students to determine where they are by making them understand the criteria for quality work so that they are able to assess themselves as fairly and accurately as possible.
- Provide students with opportunities to discuss their self- assessment in the light of peer and teacher assessments.
- Students should be made to give descriptive evaluations with justification rather than scores and grades.
- To help the students get where they need to go, teachers can develop with students clearly articulated goals and monitor the goals that students have set for themselves.

(पृष्ठ क्र. ४० वर)

# वाचन : एक अमृतानुभव !

**पी. एम. काळे**
७ अ., संजीवराजेनगर, फलटण,
जि. सातारा.
भ्रमणध्वनी : ९८२३२५७०६६

*बालवयात वाचन संस्कार घडणे आवश्यक असते. त्यासाठी वर्ग वाचनालय, फिरते वाचनालय असे अनेक उपक्रम राबविले जातात. या लेखात अंथरलेले ग्रंथालय याचा संदर्भ आलेला आहे. हे सगळे वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी आहे, पण नेमके काय वाचावे, का वाचावे, कशासाठी वाचावे या प्रश्नांची उत्तरे उलगडणारा सुंदर लेख.*

*दिसामाजी काही तरी लिहीत जावे ।*
*प्रसंगी अखंडित वाचीत जावे ।।*

श्री समर्थ रामदासांच्या वचनानुसार भाषाभगिनींच्या क्रमवारीत श्रवण, भाषण, वाचन, लेखन यांत तिसऱ्या स्थानावर असलेले वाचन आणि श्रवण हे ग्रहणात्मक तर भाषण व लेखन हे उत्पादक भाषाकौशल्य अत्यंत मोलाचे आहे, कारण वाचन हा एक संस्कार आहे. तो एक अद्‌भुतरम्य प्रवास आहे, घरबसल्या केला जाणारा ! शब्द, वाक्यांच्या वेलीवर फुललेली माहिती, ज्ञान, रंजन, विचारांची रंगीत व गंधीत फुले अलगद वाचकांच्या मनाची परडी समृद्ध करतात.

या समृद्धीतूनच पुढे जन्माला येतात शिक्षक, वक्ते, डॉक्टर, विचारवंत, साहित्यिक, वैज्ञानिक, राजकारणी, समाजसेवक अन् तत्त्वज्ञही ! या सर्वांच्या योगदानामुळे राष्ट्रे स्वतंत्र होतात, उभारतात, प्रगती करतात अन् महान बनतात.

या वाचन संस्कारांचा पाळणा हलतो तो पुस्तकांच्या स्पर्शाने, हाताळण्याने, सुगंधाने आणि जवळ बाळगल्याने. यासाठी विद्यार्थी, पालक, शिक्षक व शाळा यांनी काही भरीव कृती करायला हव्यात.

- पालकांनी लहान वयातच मुलांना गोष्टीची छोटी छोटी पुस्तके द्यावीत. त्यातील कथा त्यांना वाचून दाखवाव्यात. त्यातील चित्रे वाचायला शिकवावीत.
- शाळांनी 'अंथरलेले ग्रंथालय' यासारखे उपक्रम राबवून प्रत्येक सत्रात किमान दोन दिवस विद्यार्थी पुस्तकांच्या दुनियेत मुशाफिरी करतील हे पाहावे.
- प्रत्येक आठवड्यात किमान एक तासिका ग्रंथालय तासिका म्हणून ठेवावी.
- शाळा भरण्यापूर्वी किंवा शाळा सुटल्यानंतर २०-२५ मिनिटे अवांतर वाचनासाठी ठेवावीत.
- पर्यवेक्षित वाचन घ्यावे.
- वर्गवार वाचन गट तयार करावेत.
- डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम वाचन कट्ट्यामध्ये वयोगटानुसार मासिके व पुस्तके पुरवावीत.
- वाचन कट्ट्यासाठी वेळापत्रक तयार करून त्यानुसार कार्यवाही करावी.
- सुरुवातीला हलके-फुलके मनोरंजनात्मक गोष्टीरूप साहित्य पुरवावे.
- मातृभाषेपासून द्वितीय व तृतीय भाषेच्या वाचनाची क्रमवारी लावावी.
- ग्रंथदिंडी, पुस्तकमहोत्सव, पुस्तकाच्या गावाला भेट इत्यादी कृतींतून वाचनकौशल्य सतत केंद्रस्थानी ठेवावे.

- वाचनाची गोडी लावण्यासाठी प्रकटवाचन, अनुवाचन, मूकवाचन, क्रमशः वाचन, नाट्यवाचन, काव्यवाचन, कथावाचन या व अशा कृतींचा उपयोग करावा.

वाचनकौशल्याच्या विकसनासाठी काय ? कसे ? आणि कशासाठी ? याचा विचार होणे अनिवार्य आहे.

**काय वाचावे ? :** काय वाचावे याला फार महत्त्व आहे. जे श्लील आहे ते सर्व वाचावे. वयोगटानुसार निवड निश्चितच उपयोगी पडेल. हाताला लागेल ते वाचले, तर अनर्थ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी श्री. अरुण टिकेकर म्हणतात, 'आयुष्याच्या सुरुवातीलाच वाचनगुरू भेटला, तर समर्पक वाचनाला योग्य दिशा व गती लाभते. वाचक घडतो, घडवावा लागतो. विद्यार्थ्यांसाठी त्यांचे पालक, शिक्षक हे त्यांचे वाचनगुरू बनू शकतात. त्यांच्या वाचनात आलेली चांगली वाक्ये, परिच्छेद, गद्य–पद्य यांतील सौंदर्यस्थळे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देऊन त्यांना वाचनाचा लळा लावू शकतात.'

**कसे वाचावे ? :** नवशिक्यांच्या पुढ्यातील हा कळीचा प्रश्न आहे. त्यासाठी मदतीला डॉ. उषा खिरे आहेतच. त्यांनी सांगितलेले वाचनाचे सात सोपान जरूर लक्षात घ्यावेत :

(१) शब्दबोध : संदर्भानुसार शब्दाचा अर्थ कळणे.

(२) दिशा : डावीकडून उजवीकडे व वरून खाली वाचत जाणे.

(३) पुनर्गमन : वाचलेल्या शब्दाकडे पुन्हा नजर न जाऊ देणे.

(४) दृष्टीचा आवाका : एका दृष्टिक्षेपात २–३ शब्द वाचणे.

(५) उच्चारण : शब्द पाहणे, मनात उच्चार करणे, शब्दबोध घेणे.

(६) आकलन : शब्द, वाक्ये व परिच्छेद यांचा अन्वयार्थ लावणे.

(७) शब्दसंग्रह : भरपूर वाचनाने शब्दसंग्रह वाढवणे, त्याच्या अर्थच्छटा जाणून घेणे.

**कशासाठी वाचावे ? :** वाचनाचे खूप फायदे आहेत. वाचनाने व्यक्तिमत्त्व उजळून निघते. आत्मविश्वास वाढतो. मार्गारेट फुलर म्हणतात, "Today a Reader, tomorrow the Leader" हे खरे आहे. नवनवीन ज्ञान, तंत्रज्ञान, कौशल्ये अभिव्यक्ती तंत्रे आत्मसात करून आपापल्या क्षेत्रात अग्रणी राहावे, नेतृत्व करावे, यालाच जोडून असे म्हणता येईल, की "Today a Reader, tomorrow the Writer, the Scientist, the Speaker, the Actor, the Doctor, the Teacher, the Engineer and what not." सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणसात माणुसकी भरते ते वाचनच!

चांगल्या पुस्तकांचा संग्रह आपल्याकडे असायलाच हवा. त्यासाठी थोडीशी पदरमोड झाली तरी चालेल. ऑस्टिन फेल्पस म्हणतातच ना "Wear the old coat but buy a new book."

वाचनाचा हा प्रवास व्यवस्थित प्रगतीकडे चालला आहे की नाही, हे पडताळण्यासाठी शिक्षक मित्रांनी लघू कृतिसंशोधन करावे. वाचनाचा केवळ वेग. आकलनासह वेग अशा संशोधनातून हाती लागेल. यातील निष्कर्षातून पुढील कृती व दिशा ठरवता येतील. वाचनवेग काढण्यासाठी डॉ. अ. ल. देशमुख यांनी छान सूत्रे दिली आहेत.

(१) $\text{वाचनवेग} = \dfrac{\text{वाचलेली शब्द संख्या}}{\text{लागलेला वेळ (सेकंदात)}} \times ६०$

(२) $\text{आकलनासह वाचनवेग} = \text{नुसता वाचनवेग} \times \dfrac{\text{प्राप्त गुण}}{\text{एकूण गुण}}$

विद्यार्थी, पालक व शिक्षक मित्रांनो, वाचनाचे अगणित फायदे आहेत. वाचनाने शहाणपण येते. मनाचा पैस वाढतो. आत्मविश्वास वाढतो. वैचारिक बैठक तयार होते. जगावे कसे हेही वाचन शिकवते. वाचनानंद एक परमानंद देणारा अमृतानुभव आहे.

# परसबागेचे महत्त्व व शैक्षणिक उपयोजन

**प्रा. विजयकुमार पाईकराव**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

*पूर्वी घरासमोर अंगण, तर मागे परस (परडे) असायचे. घरामागच्या मोकळ्या जागेत आवश्यक वनस्पती, वेल लावले जायचे. पुढे याचेच रूपांतर परसबागेत झाले. आता घराजवळ, शाळेजवळ उपलब्ध असणाऱ्या जागेत केलेली लागवड, म्हणजे 'परसबाग' अशी नवी संज्ञा रुजत आहे. शाळेजवळ उपलब्ध असणाऱ्या जागेत अनेक शाळा, उपक्रमशील शिक्षक परसबाग फुलवताना दिसतात. त्यांना तसेच नव्याने परसबागेची निर्मिती करणाऱ्यांना मार्गदर्शक ठरणारा उत्तम लेख.*

अध्ययनार्थी बंधू-भगिनी, आपल्या शाळेभोवती व घरासमोर असलेली मोकळी जागा मग ती खाली असो, गच्चीवर असो, बाल्कनीतील असो किंवा सोसायटीची असो, त्यावर लावलेली फळझाडे, भाजीपाला, फुलझाडे, औषधी व सुगंधी वनस्पती या परसबाग फुलवतात आणि परिसराचे सौंदर्य खुलवतात आणि पर्यावरण संवर्धन करतात.

आजच्या धावपळीच्या आयुष्यात निसर्गाच्या सान्निध्यात राहण्यासाठी, निसर्गाचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी सर्वांनाच वेळ मिळतो असे नाही. निसर्गाची आवड सर्वांनाच असते आणि आपली परसबाग असावी; त्यामध्ये विविध प्रकारची फुलझाडे, भाजीपाला, फळझाडे असावीत असे वाटत असते. अलीकडच्या काळात अशा प्रकारची परसबाग फुलविण्याचे काम अनेक जण करतात. खरे तर आपण सर्वांनीच आपल्याकडे उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागेचा उपयोग करून छानशी परसबाग फुलवावी व सजवावी.

ज्यांच्याकडे मोठी मोकळी जागा नसेल, त्यांनी टेरेस गार्डन करावे. ज्यांच्याकडे बाल्कनीची मोठी जागा असेल त्यांनी फुलझाडे, औषधी-सुगंधी वनस्पतींची लागवड करावी. परसबाग आणि टेरेस गार्डनची संकल्पना अलीकडे पुढे येत आहे. अनेकांनी त्यादृष्टीने चांगले प्रयत्न केल्याचे दिसत आहे. परसबागेचे चांगले व्यवस्थापन केले, तर आपल्याला चांगला भाजीपाला स्वतःच पिकवता येतो. आपल्याला लागणारा भाजीपाला, कुंड्यामध्येही लावता येतो. उदा., भोपळा, कारले, दोडके, काकडी, टोमॅटो, मिरची, पालक, कोथिंबीर लावता येते. त्याचप्रमाणे पसरबागेत फुलबाग तयार करता येते. त्यामध्ये आपण शोभिवंत झाडे लावू शकतो. आरोग्यासाठी उपयुक्त असणाऱ्या औषधी वनस्पतींच्या कुंड्या तयार करू शकतो. परसबागेतील फुलांचा वापर आपण स्वागतासाठी, देवपूजेसाठी, वेणी, गजरा तयार करण्यासाठी व सजावटीसाठी करू शकतो. त्यासाठी मोगरा, जास्वंद, जाई-जुई, अबोली, झेंडू अशी फुलझाडे परसबागेत लावावीत.

### औषधी वनस्पती :

औषधी वनस्पतींचा आरोग्यासाठी चांगला उपयोग होतो. त्यामुळे परसबागेत कोरफड, ज्येष्ठमध, अश्वगंधा, सफेद मुसळी, तुळस, सोनामुखी इत्यादी वनस्पती लावाव्यात. आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी आपल्या

परसबागेत या औषधी वनस्पती जरूर लावाव्यात. त्यामध्ये कोरफड, अश्वगंधा, शतावरी, आंबेहळद, ज्येष्ठमध, गवतीचहा, पुदिना, वाळा, वेखंड, गुळवेल, रिठा, पानपिंपळी, शिकेकाई अशा अनेक वनस्पतींचा समावेश होतो. विविध आजारांवर या वनस्पतींचा वापर करता येतो. त्यामुळेच औषधी आणि सुगंधी वनस्पतींच्या अस्तित्वाशिवाय परसबाग परिपूर्ण वाटत नाही. परसबागेत पपई, पेरू, आंबा, लिंबू, कढीपत्ता, आवळा, डाळिंब, चिकू ही फळझाडे लावून ताजी फळे खाण्याचा आस्वाद घेता येतो. त्यातूनच पर्यावरणाचा समतोल राखणे हे आपल्या सर्वांच्याच हिताचे आहे.

**परसबागेचे महत्त्व :**

आजच्या काळात परसबागेचे फार महत्त्व आहे, हे लक्षात आल्याशिवाय राहणार नाही; कारण त्यामुळे आपल्याला निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याचा आनंद मिळतो, तसेच ताजा भाजीपाला, ताजी चवदार फळे व सुंदर फुले मिळतात. शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहते. वेळप्रसंगी परसबागेतील दर्जेदार औषधींचा उपयोग करता येतो. घरातील वयोवृद्धांना चांगला विरंगुळा मिळतो. शिल्लक राहिलेल्या भाज्या वाळवून साठवता येतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे परसबागेमुळे आपला दैनंदिन भाजीपाला, फुले, फळे घरीच मिळाल्याने पैशांची मोठी बचत होते. त्यामुळे प्रत्येकाने जमेल त्या पद्धतीने परसबाग फुलवावी.

**परसबागेचे प्रकार :**

परसबागेचे अनेक प्रकार आहेत. त्यामध्ये जागेची उपलब्धता, कुटुंबातील सदस्यांची संख्या यावरून काही प्रकार पडतात. (१) मोठी परसबाग, (२) मध्यम परसबाग, (३) छोटी परसबाग आणि (४) कुंड्यांमधील झाडे असे प्रकार करता येतात. जेव्हा घराच्या, बंगल्याच्या व शाळेच्या प्रांगणात १५–२० गुंठ्यांपेक्षा जास्त जागा असते, त्याला आपण मोठी परसबाग म्हणतो. परसबागेत कुटुंबातील सदस्य काम करू शकतात. आपला छंद जोपासू शकतात. मध्यम स्वरूपाच्या म्हणजे ५ गुंठ्यांपासून तर २० गुंठ्यांपर्यंतच्या जागेत परसबागेत काही उपयुक्त फळझाडे, वेलवर्गीय भाज्या, हंगामी भाजीपाला, औषधी वनस्पती, फुलझाडे, बोन्साय, सुगंधी वनस्पतींची लागवड करून कुटुंबातील सदस्यांना छंद जोपासता येतो. छोट्या परसबागेत ५ गुंठ्यांपर्यंत जागा असल्यास ; भाजीपाला, औषधी वनस्पती, फुलझाडे, काही महत्त्वाचे वृक्ष यांची लागवड करता येते; परंतु जेव्हा परसबागेसाठी जागाच नसते, त्या वेळी कुंड्यांमध्ये झाडे लावता येतात. जागा नसल्यास टेरेसवरसुद्धा कुंड्या, रिकामे डबे (तूप/तेलाचे, ड्रम, बरणी, बादली इत्यादींमध्ये आडे लावता येतात. परसबागेत उपयुक्त अशा फळझाडांची लागवड केल्यास फायदा तर होतोच, पण बाग अतिशय सुंदर दिसते. पर्यावरणास पोषक वातावरण तयार होते.

परसबाग तयार करण्यापूर्वी मातीत चांगले खत टाकून माती सुपीक करून घ्यावी. फळझाडांसाठी खोल खड्डे करून घ्यावेत, त्यानंतर फळझाडे लावावीत. झाडांच्या सुधारित जातींचा व कलमांचा वापर केल्यास फळे लवकर मिळतात. लागवड करताना झाडांमध्ये पुरेसे अंतर ठेवावे, जेणेकरून परसबागेत गर्दी होणार नाही.

परसबागेत विविध प्रकारची रंगसंगती असलेल्या फुलझाडांची लागवड करता येते. देवासाठी, घरात सजावट करण्यासाठी, पाहुण्यांच्या स्वागतासाठी फुलांचा वापर करता येतो. तसेच फुलांमुळे परसबाग आकर्षक दिसते. गुलाबाची फुले सर्वांना आवडतात, त्यासाठी गुलाबाची

वेगवेगळ्या रंगच्छटा असलेली फुलझाडे लावावीत. गुलाबापासून अत्तर, गुलाबपाणी, गुलकंद, तेल बनविता येते. त्याचप्रमाणे मोगरा, निशिगंध, सदाफुली, लीली, झेंडू, डेझी, कार्नेशन, ॲस्टर, जास्वंदी, ग्लॅडिओलसची लागवड केल्यास परसबाग मनमोहक बनते. फुलझाडांची निगा राखताना पाण्याचे नियोजन, कीड यांकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. मधमाशा, फुलपाखरे यांच्या बागडण्याने निसर्गाच्या सान्निध्यात वावरण्याचा आनंद लुटता येतो.

### परसबागेसाठी उपयुक्त खते :

परसबागेतील वनस्पतींना योग्य वाढीसाठी पोषक अन्नद्रव्यांची गरज असते. ही पोषकद्रव्ये विविध प्रकारच्या खतांद्वारे मिळू शकतात. खतांचेही अनेक प्रकार आहेत. त्यामध्ये (१) सेंद्रीय खते, (२) हिरवळीची खते, (३) जैविक खते आणि (४) रासायनिक खते असे प्रामुख्याने चार प्रकार पडतात. चांगले कसदार असे अन्न मिळवायचे असेल, तर परसबागेला रासायनिक खतांचा जास्त वापर करू नये. सेंद्रिय खते, हिरवळीची किंवा जैविक खते वापरल्यास परसबागेच्या जमिनीची सुपीकता टिकून राहते. सेंद्रिय खतांच्या वापराने जमीन भुसभुशीत राहते. जमिनीची धूप कमी होते. हवा खेळती राहते आणि त्यामुळेच फळभाज्या, भाजीपाला, फळे अतिशय चांगल्या दर्जाची मिळतात.

### परसबागेसाठी पाणी नियोजन :

परसबागेतील सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे पाण्याचे योग्य असे नियोजन आणि व्यवस्थापन करणे, झाडांमध्ये विविध खनिजे, पोषकद्रव्ये वाहून नेण्यासाठी, पेशींचे विभाजन, विविध क्रिया करण्यासाठी पाणी हा घटक अतिशय महत्त्वाचा असतो. काही झाडांना खूप पाणी लागते, तर काहींना अतिशय कमी पाणी लागते. पाण्याची कमतरता असेल, तर त्याचे नियोजन हे अगोदरच करणे गरजेचे असते. झाडांना पाणी जास्त झाले, की मुळे कुजतात आणि पाने पिवळी पडतात. पावसाळ्यात पाणी देण्याची गरज नसते, परंतु पाऊस पडण्यास उशीर झाला तर पाणी द्यावे. फळधारणा होत असताना झाडांना पाण्याची जास्त गरज असते. पाणी देताना शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळी द्यावे. कुंड्यांमध्ये जी झाडे लावलेली असतात, त्यांना पाणी देताना छिद्रावाटे पाण्याचा व्यवस्थित निचरा होतो की नाही ते बघून घ्यावे. पाणी देण्याच्या अनेक पद्धती आहेत. त्यामध्ये मुक्त पद्धतीने, रबरी नळीने, झारीने, आळे पद्धतीने, सरी वरंबा पद्धतीने, तुषार सिंचन, ठिबक सिंचन अशा पद्धतींचा वापर केला जाऊ शकतो. पाण्याचा अपव्यय होऊ नये यासाठी मुक्त पद्धतीने पाणी देण्याचा वापर शक्यतो करू नये. सिंचन पद्धतींचा वापर केल्यास पाण्याची बचत होते. सांडपाणीसुद्धा परसबागेसाठी वापरून पाण्याची बचत करता येते.

### परसबागेचे संरक्षण :

परसबागेचे नियोजन करत असताना अजून एक गोष्ट महत्त्वाची असते आणि ती म्हणजे पीक संरक्षण. परसबागेतील भाजीपाला, फळभाज्या, फळे ही कीडमुक्त आणि रोगमुक्त असायला हवीत. त्यासाठी कीटकनाशकांचा वापर करावा लागतो. रासायनिक कीटकनाशके वापरल्यास कीडरोगांचा बंदोबस्त झाल्याचे परिणाम त्वरित दिसून येतात; परंतु त्यामुळे इतर दुष्परिणामांकडे लक्ष जात नाही. वस्तुतः रासायनिक कीटकनाशकांच्या वापराने विषारी अंश अन्नामधून आपल्या शरीरात जातात आणि त्याचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर होतो. त्यामुळे शक्यतो सेंद्रिय आणि जैविक पद्धतीच्या कीटकनाशकांचा वापर करावा. सेंद्रिय पद्धतीने बनविलेल्या कीटकनाशकांमुळे खर्चात

बचत होते. फळभाज्या, भाजीपाला यांमध्ये विषारी अंश शिल्लक राहत नाही. सेंद्रिय कीटकनाशके घरगुती पद्धतीने बनविता येतात. अनेक सेंद्रिय कीटकनाशके पीकसंरक्षणासाठी उपलब्ध आहेत. त्यामध्ये दशपर्णी अर्क किंवा विविध वनस्पतींचे अर्क, ट्रायकोग्रामा, गोमूत्र, क्रायसोपर्ला या कीटकनाशकांचा समावेश होतो. बुरशीयुक्त कीटकनाशकांचाही रोगनियंत्रणासाठी वापर केला जातो. परसबागेतील भाजीपाला आणि फळपिकांवर विविध किडींचा प्रादुर्भाव होत असतो. त्यामुळे सुरुवातीला रसशोषक किडे मोठ्या प्रमाणावर दिसतात. यामध्ये तुडतुडे, पांढरी माशी, मावा, थ्रीप्स यांचा समावेश होतो. या किडींमुळे झाडे कोमेजतात. पानांची वाढ खुंटते. त्यानंतर फुले आणि फळे येऊ लागली, की अळ्यांचा प्रादुर्भाव वाढतो. शेंडा खाणाऱ्या, मुळे कुरतडणाऱ्या अळ्या दिसून येतात. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सेंद्रिय पद्धतीच्या कीटकनाशकांचा वापर करावा. कडुनिंबापासून तयार केलेल्या निमार्कामुळे किडींवर नियंत्रण मिळवता येते. कडुनिंबाच्या प्रत्येक भागात अझॉडिरॅक्टिन हा घटक असतो. बियांमध्ये त्याचे प्रमाण जास्त असते. निमतेलाची फवारणी केल्यास कडवटपणामुळे पिकाला कीड खात नाही. निंबोळीपासून तयार निमार्क, निमतेल तयार करता येते. निमार्क बनविण्यासाठी पिकलेल्या निंबोळ्या ३ महिने साठविल्यानंतर ६ महिन्यांपर्यंत वापराव्यात. बिया गर काढून २–३ दिवस उन्हात चांगल्या वाळवून घ्याव्यात. निंबोळ्या सालीसह वापरायच्या असल्यास दीडपट जास्त घ्याव्यात. निंबोळ्या कुटून त्यांची भुकटी करावी. अर्धा किलो भुकटी पातळ कापडात बांधून १० लीटर पाण्यात रात्रभर भिजत ठेवावी. दुसऱ्या दिवशी कापडाची पुरचुंडी पिळून घ्यावी. त्यातून जास्तीतजास्त अर्क निघेल. त्यामध्ये २० ग्रॅम कपडे धुण्याची पावडर किंवा साबणाचा चुरा मिसळावा. मिश्रण एकजीव होईपर्यंत ढवळावे. त्यात अर्धा लीटर गोमूत्र टाकून फवारणी केल्यास सर्व प्रकारच्या किडींचा बंदोबस्त करता येतो.

### टेरेस गार्डन :

टेरेसवर भरपूर सूर्यप्रकाश आणि खेळती हवा यामुळे झाडांची चांगली वाढ होते. गच्चीवरील परसबाग तयार करण्यासाठी सुरुवातीला पूर्ण टेरेस वॉटर प्रुफिंग करून घ्यावे. बीजप्रक्रिया केलेली बियाणे वापरावीत. पॉलिथिन अंथरून त्यावर पोयटा माती, गांडूळ खत, कंपोस्ट खत वापरून छोटे वाफे तयार करावेत. त्यामध्ये पालेभाज्या, फळभाज्या, फुलझाडे, औषधी वनस्पतींची रोपे लावावी. मोगरा, गुलाब, कढीपत्ता, लिंबू यांसारखी झाडे कुंड्यांमध्ये लावता येतात. गच्चीवरील परसबागेला पाणी देताना शक्यतो झारीचा वापर करावा. काही भाज्यांना आधाराची गरज असते. त्यासाठी कुंडीमध्ये काठी रोवून ठेवावी. वेलवर्गीय भाज्यांना मांडवाची गरज असते. त्यासाठी बांबूच्या साहाय्याने चौकोनी मांडव तयार करावा, म्हणजे वेल मांडवावर चढेल. गच्चीवरील परसबागेत रोग–किडींचा प्रादुर्भाव कमी असतो.

### परसबागेचे शैक्षणिक उपयोजन :

(१) शालेय विषयातील विज्ञान, कृषी, पर्यावरण, परिसर अभ्यास, गणित, सामाजिक शास्त्रे व भाषा या सर्व विषयांचे एकात्मिक ज्ञान परसबागेद्वारे देता येते. (२) अध्ययनार्थींना मध्यान्ह भोजनात ताज्या आणि चवदार भाज्या खायला मिळतात. (३) हवेतील ऑक्सिजनचे प्रमाण वाढते. (४) वातावरणातील तापमान ६ ते ८ अशांनी कमी होते. (५) निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याचा किंवा निसर्गाचाच एक भाग म्हणनू आनंद लूटता येतो. त्यामुळे

ज्यांना शक्य आहे, त्यांनी परसबाग फुलवावी. त्याचा कुटुंबाला व शाळेला, परिसराला लाभ मिळवून द्यावा आणि इतरांनाही प्रोत्साहन द्यावे. परसबाग आपणा सर्वांच्या आयुष्यात नक्कीच आनंदच आणेल यात शंका नाही. (६) राष्ट्रीय अध्यापक व शिक्षण परिषदेनेदेखील परसबाग (Kitchen garden) सर्व शैक्षणिक संस्थांच्या परिसरात निर्माण करण्याची अनिवार्यता प्रतिपादित केली आहे.

*''अंगणी परसबाग फुलली,*
*पाने–फुले, फळांची लिपी मला कळली''*

बदलता ऋतू, बदलती ठिकाणे यांच्यामुळे परसबागेत वेगवेगळी पाने, फुले, फळे फुलतात, बहरतात. त्यांच्या रंगगंधाने मन प्रसन्न, ताजेतवाने आणि ज्ञानार्जनासाठी तयार होते. फुलेपाखरे, पशुपक्षी यांना चिरंतन अस्तित्व प्राप्त होते. अध्ययनार्थीला गंधोत्सव, स्वादोत्सवाबरोबरच शब्दोत्सव कवितेची बाग फुलवता येते.

■■■

**(पृष्ठ क्र. ३३ वरून)**

- To help the students determine what they need to do to reach the goals, teachers may identify strengths and gaps in their learning and help the students develop a realistic action plan that is practical and aligned to the goals of the curriculum.

**Accuracy of self-evaluation :**

There are possibilities of over - or under rating in self-evaluation. Lower performing and younger students tend to be more optimistic, lenient or generous than the older students. Educators should not panic when students begin to assign lower ratings for their own work, as this may indicate improved competence and a more accurate self-evaluation of performance. As students' mature and develop academically, we can expect self-evaluation to become more accurate. Students need to be motivated to evaluate themselves meticulously and judiciously. If there is an unreasonable wide gap between the students and teachers evaluations, the discrepancy with the students may be discussed for the purpose of moderation.

**Shift focus to self-evaluation :**

Students' self-evaluation contributes to improved learning outcomes as it actively engages them in the processes of goal setting, self-monitoring and evaluation based on objective criteria. The greatest improvement in performance through self-evaluation is seen among the low performing students'. Thus, the gap between low-and high performing students can be narrowed using self-evaluation tools and techniques. Assessment processes in which teachers hold all the power and make all the choices limit the potential of learners' development. The task of self-evaluation shifts the focus from something imposed by someone else to a potential partnership. Self-evaluation processes give our students the skills and motivation to be lifelong learners.

■■■

## प्रिय संपादक ....

आपला माहे सप्टेंबर २०२३ 'जीवन शिक्षण'चा अंक वाचनीय आहे. हा अंक आपल्या गुरूप्रति समर्पित असून त्यात आपल्या गुरूंची गुणवैशिष्ट्ये प्रतिबिंबित झालेली दिसून येतात. 'गुण गाईन आवडी', 'शिक्षकत्वाचे एव्हरेस्ट – बॅ. पी. जी. पाटील' व 'बालमुखावरील हास्य... हाच खरा शिक्षक पुरस्कार!' हे लेख आपल्या जडणघडणीत असलेले गुरूंचे महत्त्व सांगणारे व 'असे शिक्षक होणे नाही', 'मारक्या गुरुजींनी तोल सावरायला शिकवले' यासह सर्वच लेख गुरूंना वंदन करणारे, प्रेरणादायी आहेत. अंकातील सर्वच लेख दर्जेदार आहेत. संपादक मंडळाचे आभार.

**विद्या सा. दामोदरे**
जि. प. उच्च प्राथ. शाळा नायगाव,
ता. अचलपूर, जि. अमरावती.

'जीवन शिक्षण' सप्टेंबर २०२३ चा अंक म्हणजे ज्ञानाचा खजिना आहे. अंकातील सर्वच लेख गुरुवर्यांना समर्पित असे आहेत. गुरूंच्या शिकवणीमुळे आपण उच्च पदावर गेलो याची जाणीव लेखातून दिसून येते. 'शिक्षकत्वाचे एव्हरेस्ट – बॅ. पी. जी. पाटील' व 'बालमुखावरील हास्य... हाच खरा शिक्षक पुरस्कार!', 'गुण गाईन आवडी', 'तस्मै श्री गुरवे नमः' यांसह सर्वच लेख प्रेरणादायी आहेत. इतिहासाच्या पानावरून तर सर्व शिक्षकांचे १०० वर्षांपूर्वीचे वेतन व त्यांच्या वेतनश्रेणीसह प्रशिक्षणाची उपयुक्त माहिती इत्थंभूत वर्णन केली आहे व ती शिक्षकांसाठी खूप प्रेरणादायी आहे. 'मारक्या गुरुजींनी तोल सावरायला शिकवले', 'शिक्षक हेच दुसरे पालक' हे लेख शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांसाठी अनुकरणीय आहेत. अंक खूप सुंदर आहे. मा. संपादक मंडळ व प्रकाशन समितीचे खूप खूप आभार.

**एस. डी. दामोदरे** (माजी सदस्य)
महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
विभागीय मंडळ, अमरावती.

टपालातून सप्टेंबर २०२३ चा 'जीवन शिक्षण' अंक हातात पडला. संपादकीय पान वाचले आणि चांगल्या लेखांची मेजवानी मिळाली.

डॉ. वसंत काळपांडे, माजी शिक्षण संचालक यांचा लेख वाचायला घेतला. या लेखात इयत्ता पहिली ते महाविद्यालयीन जीवनात त्यांच्यावर झालेले शिक्षकांचे संस्कार वाचत असताना, मला माझ्या शिशुवर्गाच्या आपटे बाई, इ. पहिली ते चौथीला असलेल्या राखाडे बाई, गोटस्कर बाई, इ. पाचवी ते दहावीला असलेले भडांगे सर, बढे बाई, मस्तूद सर, हांडे सर आदींची आठवण आली. ते दिवस डोळ्यांपुढे आले. या आठवणींना उजाळा 'जीवन शिक्षण'चा अंक व डॉ. वसंत काळपांडे, माजी शिक्षण संचालक यांच्यामुळे मिळाला.

डॉ. वसंत काळपांडे, माजी शिक्षण संचालक यांची व माझी ओळख अगदी काही क्षणांचीच, त्यांच्या काळात सरांच्या नावाचा व कामाचा खूप दबदबा होता. तत्कालीन शिक्षणमंत्री कै. रामकृष्ण मोरे हे महाराष्ट्रातील 'वस्ती शाळा' उद्घाटन प्रसंगी शहापूर येथे आले होते, तेव्हा डॉ. वसंत काळपांडे सरांशी संवाद साधण्याची संधी मिळाली आणि त्यानंतर आज सरांच्या लेखाने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.

अंकातील सर्वच लेख प्रेरणा देणारे आहेत.

**सुधीर पुंडलिक भोईर**
जि. प. प्राथ. शाळा रातांधळे,
केंद्र बिरवाडी, ता. शहापूर, जि. ठाणे.

श्रीकांत चौगुले
भ्रमणध्वनी : ७५०७७७९३९३

# यशवंतरावांची गांधीजींना अनोखी भेट

२ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधीजींची जयंती असते. गांधीजींच्या पुढाकाराने देशाला स्वातंत्र्य मिळाले. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी आपला देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर सगळीकडे आनंदाचे वातावरण होते. त्यानंतर अवघ्या दीड महिन्यातच २ ऑक्टोबर, १९४७ रोजी गांधीजींचा ७९ वा वाढदिवस होता. त्यानिमित्ताने यशवंतराव चव्हाणांनी गांधीजींना आगळीवेगळी भेट द्यायचे ठरवले.

यशवंतराव चव्हाण १९४६ मध्ये सातारा दक्षिण मतदार संघातून निवडून आले होते. त्यांना पार्लमेंटरी सेक्रेटरी हे पद मिळाले होते. त्यांचा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग होता. गांधीजींवर त्यांची श्रद्धा होती. त्या काळात पुण्यातील ट्रेनिंग कॉलेज प्रसिद्ध होते. तेथे इतर ज्ञानाबरोबरच शिक्षकांना सुतकताईचे प्रशिक्षण दिले जात असे. त्यासाठीची सर्व व्यवस्था व सुविधा ट्रेनिंग कॉलेजमध्ये होती. यशवंतराव चव्हाण व त्यांचे सहकारी नवल पाटील या दोघांनी ट्रेनिंग कॉलेजमध्ये वास्तव्य करून, चरख्यावर ७९ तास सुतकताई केली व त्यातून तयार झालेले सूत गांधीजींना ७९ व्या वाढदिवसाची भेट म्हणून त्यांना पाठवले. याचे वृत्त प्राथमिक शिक्षक (जीवन शिक्षण) च्या जानेवारी १९४८ या अंकात संक्षिप्त रूपात देण्यात आले आहे. पुढे काही वर्षांतच यशवंतराव चव्हाण मुंबई प्रांताचे पहिले मुख्यमंत्री झाले, तसेच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. त्यांनी स्वतःच्या कष्टातून तयार केलेले सूत गांधीजींना अर्पण करून वाढदिवसाची दिलेली ही भेट व त्याची नोंद ऐतिहासिक ठरली.

तो काळ राष्ट्रप्रेमाने भारलेला होता. त्या काळात चरख्यावर तयार केलेल्या सुताचे हार घालून एकमेकांचे स्वागत, सत्कार करत. सूत हे केवळ कापड तयार करण्याचे साधन नव्हते, तर ते राष्ट्रप्रेमाचे प्रतीक ठरले होते, त्यामुळे स्वतः तयार केलेल्या सुताला अनन्यसाधारण महत्त्व होते. यशवंतराव चव्हाण महागडी भेटवस्तूही गांधीजींना देऊ शकले असते, पण त्यांनी स्वकष्टातून तयार केलेले सूत भेट दिले. ते अनमोल होते. शेवटी त्या सुताचे बापूजींनी काय केले हे मात्र कळले नाही.





एससीईआरटी, महाराष्ट्र, पुणे येथे बालशिक्षण संदर्भातील राज्यस्तरीय कार्यशाळेच्या आयोजनात बालशिक्षणाचा हेतू, प्रशासकीय यंत्रणा, यशस्वी प्रकल्प या अनुषंगाने ४७ अशासकीय संस्थांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचे सादरीकरण करण्यात आले. याप्रसंगी मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य आणि परिषदेचे मा. संचालक यांनी मार्गदर्शन केले.

नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत राज्य स्तर प्रशिक्षणाच्या उद्घाटन प्रसंगी मा. सूरज मांढरे, आयुक्त (शिक्षण) आणि मा. अमोल येडगे, संचालक, एससीईआरटी, महाराष्ट्र, पुणे यांनी मार्गदर्शन करताना नावीन्यपूर्ण उपक्रमांची जोड देऊन सर्व प्रौढांना साक्षर करण्याचे आवाहन केले.





Date of Publication : 1 October, 2023
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th October, 2023
at GPO, PSO, Pune - 411 001.

**'Registered'**

Reg. No. RNI No. 14563/1957
Post Registration No.: PCW/063/2021-2023
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**



एससीईआरटी, महाराष्ट्र, पुणे च्या वतीने दि. २४ मार्च २०२३ रोजी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षणाचा (SLAS) अहवाल दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.

सदर प्रकाशन प्रसंगी मा. रनजीतसिंह देओल, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मा. सूरज मांढरे, आयुक्त (शिक्षण), मा. अमोल येडगे (भा.प्र.से.) संचालक, एससीईआरटी, पुणे उपस्थित होते. तसेच राज्यस्तरीय इतर संस्थांचे सर्व संचालक, परिषदेचे मा. रमाकांत काठमोरे, सहसंचालक, डॉ. कमलादेवी आवटे, उपसंचालक डॉ. माधुरी सावरकर, उपसंचालक, डॉ. नेहा बेलसरे, उपसंचालक तसेच राज्यातील सर्व विभागीय उपसंचालक उपस्थित होते.

व्ही.जी.पी.जी. विभाग व एन पॉवर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या स्वजीवी महाराष्ट्र या प्रशिक्षणासाठी मा. अमोल येडगे (भा.प्र.से.) संचालक, एससीईआरटी, पुणे तसेच मा. डॉ. कमलादेवी आवटे, उपसंचालक व डॉ. दिपक माळी, उपविभाग प्रमुख यांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला व मार्गदर्शन केले.





पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०-२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

**प्रति** ____________________